महाराष्ट्र राज्य रवीन्द्रनाथ टागोर जन्मशताब्दि समिति

९९६२
म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. ९५८५

# रवीन्द्र-गौरव



REFBK-0012711
REFBK-0012711

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम 3८2८५ वि: ....
क्रमांक ७५८५ नों दि: 25-2-८3

अनुक्रम 38265
दि. 24-
मराठी ग्रंथ संग्रहालय
92699



# र वीं द्र
# गौ र व

REFBK-0012711
REFBK-0012711

## नि व ड क क वि तां चा सं ग्र ह

व्ही न स बु क स्टॉ ल : पु णें २.

महाराष्ट्र राज्य रवीन्द्रनाथ टागोर
जन्मशताब्दि समितीसाठीं
प्रकाशक :
अ. ह. लिमये
व्हीनस बुकस्टॉल पुणें २.
प्रकाशन क्रमांक : ३०
प्रथमावृत्ति : १४ सप्टेंबर १९६२
सर्व हक्क स्वाधीन
मूल्य रु. तीन मात्र
मुद्रक :
वि. ग. माटे
विश्वकर्मा मुद्रणालय
४०५, नारायण पेठ, पुणें २.

# निवेदन

महाराष्ट्र राज्य टागोर शताब्दि समितीने रवींद्र जयंतीच्या उत्सवाचे जे विविध कार्यक्रम केले, त्यांपैकी ता. २८–११–६१ रोजी मुंबई येथे झालेला रविगौरव कविसंमेलनाचा कार्यक्रम हा विशेष संस्मरणीय होय. महाराष्ट्र कवि श्री. यशवंत आणि मुंबईचे सुप्रसिद्ध कवि श्री. राजा बढे या दोघांनी निमंत्रक या नात्याने हें कविसंमेलन भरविण्यांत आणि तें यशस्वी करण्यांत जो पुढाकार घेतला, त्याचा प्रारंभींच कृतज्ञतापूर्वक उल्लेख करणें अवश्य वाटतें.

वास्तविक अशा तऱ्हेचा कवितांचा संग्रह प्रसिद्ध करण्याची योजना प्रकाशनाचा मूळ कार्यक्रम जो टागोर समितीने आखला होता त्यांत नव्हती. तथापि नामवंत कवींच्या अशा चांगल्या कविता पुस्तकरूपानें जर एकत्रित आणल्या तर गुरुदेव टागोरांच्या काव्याचा परिचय काव्यरूपानें ग्रथित होऊन मराठी साहित्यांत बहुमोल भर पडेल असें समितीला वाटलें आणि त्यानुसार या ग्रंथाचें प्रकाशन करण्याचें समितीनें ठरविलें.

या संमेलनांत महाराष्ट्रांतील आणि बृहन् महाराष्ट्रांतील सतरा कवींनी प्रत्यक्ष भाग घेतला. कविभूषण प्रा. अण्णासाहेब खापर्डे, श्री. गिरीश, श्री. अनिल आणि प्रा. राम शेवाळकर हे निमंत्रित कवि कांही अडचणींमुळे संमेलनांत भाग घेऊं शकले नाहीत. तथापि त्यांनी प्रस्तुत संग्रहांत समाविष्ट करण्यासाठी आपल्या कविता अगत्यानें पाठविल्या. फक्त महाराष्ट्रांतील अग्रगण्य ज्येष्ठ कवि नागपूरचे श्री. अनिल यांना मात्र त्यांच्या मागच्या निरनिराळ्या व्यापांमुळे कविता पाठविणें शक्य झालें नाही. प्रस्तुत संग्रहांत आपल्या कवितांचा समावेश करावयाला संमति दिल्याबद्दल समिति या सर्व कवींची आभारी आहे.

या संग्रहांतील बहुतेक कविता म्हणजे गुरुदेवांच्या निरनिराळ्या स्वरूपांच्या कवितांचा अनुवाद आहे. हा अनुवाद महाराष्ट्रांतील प्रमुख लोकप्रिय कवींनी केला असल्यामुळे तो किती सरस झालेला आहे, हें वाचकांच्या अनुभवाला येईलच. त्याचप्रमाणे या संग्रहांत गुरुदेवांचें यशोगान करणाऱ्या कांहीं स्वतंत्र कविताहि आहेत. त्या कवितांत महाराष्ट्रांतील जनतेची गुरुदेवांविषयीची नितांत आदराची भावना प्रतिबिंबित झालेली आहे, असें म्हणावयाला शंका वाटत नाही.

सारांश, अशा या छोट्या संग्रहाच्या रूपाने खुद्द गुरुदेवांच्या कांही उत्कृष्ट कवितांचा अनुवाद आणि त्यांचा गौरव करणाऱ्या सुंदर कविता मराठी वाचकांना प्रथमच वाचावयाला मिळणार आहेत, असें म्हटल्यास त्यांत अतिशयोक्ति होणार नाही.

हा संग्रह अनेक दृष्टींनी प्रातिनिधिक आहे, असें म्हणता येईल. महाराष्ट्रांतील आजच्या निवडक प्रमुख कवींनी केलेला गुरुदेवांच्या निवडक उत्कृष्ट कवितांचा अनुवाद यांत समाविष्ट केलेला आहे, व त्यामुळें गुरुदेवांच्या शिशुगीतापासून तो भक्तिगीतांपर्यंत सर्व प्रकारच्या कवितांचा पाठ्य आणि गेय अशा दोन्ही स्वरूपांत आस्वाद घेण्याची संधि मराठी वाचकांना लाभणार आहे. यांपैकी कांही कवितांचा अनुवाद जसा कांही कवींनी आपल्या स्वतःच्या आवडत्या वृत्तांत आणि विशिष्ट शैलीने केलेला आहे, त्याचप्रमाणे कांही कवींनी गुरुदेवांचीं वृत्तें, भाषा आणि शैली यांचें शक्यतोंवर अनुकरण अनुवाद करतांना केलेलें आढळेल. त्यामुळें, मूळ बंगाली रचनेचें स्वारस्य मराठी वाचकांना थोडें तरी या संग्रहांत अनुभवतां येईल, असें वाटतें. गुरुदेवांवरील ज्या गौरवपर कविता या संग्रहांत आहेत, त्या कविताहि मराठी जनतेच्या त्यांच्याविषयीच्या भावनेच्या निदर्शक आहेत. कविभूषण प्रा. अण्णासाहेब खापर्डे यांनी आपल्या "नभोराजा" या कवितेंत गुरुदेवांचा असा जयजयकार केलेला आहे कीं ––

कवींच्या महादर्श ऐशा कवींद्रा, कवींच्याहि अत्युच्च ऐशा नगेन्द्रा
नभा भेदणाऱ्या नगेंद्रा, रसेंद्रा, तुला भक्तिने वंदितों मी रवींद्रा

तर श्री. कुंजविहारी यांनी गुरुदेवांच्या आंतरराष्ट्रीय कीर्तीचें उद्‌गायन अशा रीतीने केलेलें आहे की ––

नकाशांत या असोत कितीहि राजवटीच्या खुणा
मना मनावर राज्य करी जगिं रवींद्र कविकल्पना

उलट महाराष्ट्र कवि श्री. यशवंत यांनी जणु कांही गुरुदेवांचें विश्वमानव निर्माण करण्याचें कार्य अपुरें राहिलेलें आहे या जाणिवेने, त्यांना अशी आर्त साद घातलेली आहे की––

अनेक संस्कृति सरिता ह्या
संगमल्या भारतीं जरी

अजून मंगल तीर्थांनी
कलश न भरला पूर्ण परि
म्हणून आमंत्रितों तुम्हां
अगा कवींद्रा, गुरुदेवा,
महा मानवास्तव तुमचा
ध्यास पुन्हा ललकारावा

महाराष्ट्र कवींच्या या मार्मिक कवितेंत गुरुदेवांची कविता आणि तिला लाभलेली आंतराष्ट्रीय लोकप्रियता यांच्याकडे पहाण्याच्या महाराष्ट्राच्या चिकित्सक दृष्टीचा मोठा हृदयंगम प्रत्यय येतो.

असा हा एकापरीनें अपूर्व कवितासंग्रह मराठी जनतेच्या हातीं आकर्षक स्वरूपांत देण्याच्या कामीं मुम्बईच्या जे. जे. इन्स्टिटयूट ऑफ अप्लाईड आर्ट या संस्थेचे प्रतिष्ठाता श्री. दादासाहेब अडारकर यांनी मुखपृष्ठाचें डिझाईन तयार करून देऊन जी मदत केली, तिच्याबद्दल त्यांचे आभार मानणें अवश्य आहे. पुण्याच्या व्हीनस बुकस्टॉलचे चालक श्री. अ. ह. लिमये यांनी या संग्रहाच्या प्रकाशनाची जबाबदारी घेऊन समितीला जी मदत केली आहे, तिच्याबद्दल त्यांचीहि समिति आभारी आहे. महाराष्ट्रकवि यशवंत यांनी निमंत्रक या नात्याने जशी संमेलन यशस्वी करण्याची कामगिरी हौसेने पार पाडली, त्याच प्रमाणे हा संग्रह मुद्रणालयांत छापला जात असतांना त्याची छपाई सुबक आणि शुद्ध होण्याच्या कामींहि फार परिश्रम घेतले. महाराष्ट्र कवि हे समितीचे प्रमुख कार्यकर्ते असल्यामुळे त्यांचे आभार मानणें योग्य होणार नाही. पण, अशा प्रकारचा हा अभिनव कवितासंग्रह मराठी जनतेपुढे येण्याचा सुयोग त्यांच्या सहकार्यामुळेच मुख्यतः आला, हें नमूद केल्याशिवाय राहवत नाही.

महाराष्ट्रांतील आजच्या प्रमुख कवींनी केलेलें हें गुरुदेवांचें यशोगान आणि अनुवाद मराठी वाचकांना आल्हाददायक वाटेल, अशी समितीला आशा आहे.

नागपूर
ता. ७ सप्टेंबर ६२

# अ नु क्र म :


प्रा. बळवंत गणेश खापर्डे

नभोराजा १

गिरीश

गुरुदेव रवींद्र ९
रवींद्र गीत १०
सोनार तरी ११
नव वर्षा १३

कुंजविहारी

मनामनावर राज्य करी जगिं रवींद्र-कवि-कल्पना १७
निसर्गगीता २०

यशवन्त

अगा रवींद्रा, गुरुदेवा, २२
अखेर गीत २५
नाही उत्तर २५
भ्रम झुगारुनी दे २६

प्रा. भवानीशंकर पंडित

जीवन आणि मरण २८
सिंधुमाता व पृथ्वीदुहिता २९
दादाचें ज्योतिर्दर्शन ३०

रा. अ. काळेले

गावयाचें गीत माझें ३३
दासावर करुणा करि राणी ३४

आला श्रावण ३७
वारा ३८

सोपानदेव चौधरी

नाविक गीत ४०
नयन तुझे सांगतात ४१

ना. घ. देशपांडे

रवींद्रास ४२
रवींद्र गीत ४३
स्वप्न ४३

बा. भ. बोरकर

नववधू ४९
फाल्गुन ४९

राजा बढे

चिमणावीर ५१
शामा ५४
चारुमति ५४
शिवपर्व ५५

कान्त

कवीन्द्रा, तें गाणें दे ६१

पद्मावती गोळे

याचिलें न मी तुजला कांही ६५
राहिलें तसेंच गीत ६७
सरला दिन ६८

सौ. सरोजिनी कमतनूरकर

हिंग् टिंग् छट् ७०
जीवनीं केली पूजा ७७

संजीवनी मराठे

विपत्तींत करि रक्षण माझें ७८
दिनान्त ७८
विरह ७९
तुझाच विरह साजे ८१

सौ. लीलावती भागवत

मी हतभागी जन्माची ८२
जादूची पालखी ८३
जीवित धारा ८४

श्रीकृष्ण पोवळे

इच्छिलें कांही न ८५
जीवन जेधवा शुष्क हें होई ८६

शान्ता ज. शेळके

अकारण ८८
गंमत ९०

मंगेश पाडगांवकर

चौफुला ९२

प्रा. राम शेवाळकर

आस ९७
उपायन ९८

मधुकर केचे

पुकार १००
जीवनधारा १०१
चांदेर हासीर बांध भेंगे १०२
ब्रिष्टि पोडे टापुरटुपुर १०२



## कविभूषण
## प्रा. बळवंत गणेश खापर्डे

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ............
संदर्भ शाखा (स्थळ प्रत)

### नभोराजा

रवीन्द्रा, कवीन्द्रा, नभोराज्यराजा
तुळावें कुणाला तुझ्या दिव्य तेजा ?
तुझें गोड तें तेज चंद्राहुनीहि
परी दिव्य तें तेज सूर्याहुनीहि... १

तुझ्या दिव्य ती कल्पनेची भरारी,
परी सौम्यतेने मना मोहणारी
कुठे केवि केव्हा मना ते कळे ना
परी विश्व तीच्यामधूनी उरे ना... २

जसा थांग त्वां मानवाच्या मनाचा
असे लाविला, सांग दूज्या कुणाचा
तिथे पोचला हात, ऐसी बुडीहि
अती खोल घेसी, दुज्या शक्य नाही...३

मनोभावना चित्रण्याची खुमारी
तुझी अन्य साऱ्या कवींहूनि न्यारी
खरे, तीव्र, की सौम्यहि भाव सारे
तुवां रेखिले दिव्य भाषा-प्रभो रे....४

तुझी लेखणी भाव जें रंगवीते
स्वभावांप्रती रूप ती पूर्ण देते
विचारांप्रती थोर ती व्यक्ति देते
तशी आत्मरूपा मना दाखवीते...५

निसर्गाविणे शब्द तुझा निघे ना
निसर्गाचिया वर्णना कष्टही ना
तुझ्यामाजि तो पूर्ण आहे मिळाला
निसर्गासवें पूर्ण तूं एक झाला...६

किती तीं खरीं, आणखी रम्यही तीं
तुझीं वर्णनें, वाचतां वाचतां जीं
दिसे दृश्य तें स्पष्ट नेत्रांपुढे हि
मना मोहुनी अन्य सृष्टींत नेई...७

तुझ्या भावना शुद्धगंगाजळाच्या
तयांना नसे डाग कोठे मळाचा
उदात्तत्व, शुद्धत्व, की कोमलत्व
तुझें हेंचि वैशिष्ट्य आणीक तत्त्व...८

असो भावना, कल्पना, वा स्वभाव
खुले कोमलत्वें असे तेवि दिव्य
अती गोड औचित्यही पूर्ण त्याचें
जिवा मोहितें, जिंकितें काव्य तूझें...९

तुझा कोवळा स्पर्श संजीवनी ही,
असो शब्द, की कल्पना भावनाहि
तया गोडवा तेवि दिव्यत्व देतो
तसें उच्च की खोलही तो करीतो...१०

तुझ्या शब्दसृष्टीमधें काव्य रंगे
तुझ्या शब्दसृष्टीमधें तत्त्व संगें
तुझ्या शब्दसृष्टीमधें जीव पोहे
तुझ्या शब्दसृष्टीमधें जीव आहे...११

तुझ्या शब्दसृष्टीमधें सृष्टि आहे
तुझ्या शब्दसृष्टीमधें दृष्टि आहे
तुझ्या शब्दसृष्टीमधें वृष्टि आहे
कुठेही न सृष्टींत ह्या कष्ट आहे...१२

तुझ्या शब्दशब्दामधें काव्य आहे
तुझ्या पंक्तिपंक्तीमधें काव्य वाहे
तुझ्या रोमरोमामधें काव्य आहे
तुझें काव्य आणीक तूं एक आहे,...१३

तुझी भव्य, रम्या, तशी शांत मूर्ति
तुझ्या लेखणीच्या गुणां दाविते ती
जसें रूप तूझें तुझी तेवि शैली
जगाला अलंकार दोन्हीहि झाली...१४

प्रसादा सदा वानि गीर्वाणवाणी
प्रसादें फुले रे तुझी गर्व वाणी
असो कल्पना, भावना, शब्द किंवा
झळाळें प्रसादें अहो काव्यदेवा,...१५

तुला कृत्रिमाचा कुठे डाग नाही
निघे सर्व उत्स्फूर्त, साधें, प्रवाही
तुझी सर्व जादू इथे साठवीली
जिनें दिव्यता लेखना सारि आली...१६

अशी दिव्यता वेड लावी जनाला
अशी दिव्यता मोहिते रे मनाला
अती खोल, साधें अती जें परंतु
जन तेंच वेडें करी, नाहि किंतु...१७

तुला आत्मयाची सदा ओढ आहे
तुला ईश्वराची सदा ओढ आहे
तशी लोककल्याण-कर्मींहि आहे
तुझी ओढ अत्युच्च आहे सदा हे...१८

ऋषीची कुणा आत्मशक्ती निघाली
तुझें रूप घेवोनिया व्यक्त झाली
जयीं येत, सौंदर्य घेवोनि आली
इथें ज्ञान, हें काव्य, हीं एक झालीं...१९

जगाच्या, तुझी दृष्टि एकात्मतेची
समाजांत जे दीन त्यांच्या दयेची
जगीं, तेवि दीनांमधे, ईश्वराची-
पटे साक्ष, तूंतें, अशी वृत्ति तूझी...२०

हिमाद्रीपरी तुंग ऐशा रवींद्रा
हिमाद्रीपरी शुद्ध ऐशा रवींद्रा
हिमाद्रीपरी विस्तृता हे रवींद्रा
हिमाद्रीपरी पावना हे रवींद्रा...२१

तुझी उच्चता हेरतां हेरवे ना
तुझी दिव्यता पाहतां पाहवे ना
तुझी भव्यता मानसा झेपते ना
तुझी शुद्धता मोहि गंगाजलांना...२२

हिमाद्रीतुनी त्या निघे एक गंगा
तुझ्यातूनि आल्या किती काव्यगंगा,
प्रसादान्विता शुद्ध तैशाचि झाल्या
जगा पावना ह्याहि तैशाचि झाल्या...२३

कवींद्रा, अम्हां पामरां मार्ग दावी
कवींना, समाजा, तसा मार्ग लावी
तसें, क्षुद्रजीवांसि दिव्यत्व दावी
वनो तारिका काव्यगंगा तुझी ही...२४

तुझ्या भक्तिने काव्य आम्हां कळों दे
तुझ्या भक्तिने स्फूर्ति आम्हां मिळो दे
तुझ्या कीर्तिने धीर आम्हां मिळो दे
उफाळोनियां काव्यगंगा फुलो दे...२५

अहो भाग्य हें भारताचें उदेलें
तुला श्रीहरीने इथे धाडियेलें
जुनी ती जगन्मोहिनी काव्यकीर्ति
तुवां चालविली पुढे भारताची...२६

न तूं फक्त ती चालवीली पुढे गा
तुवां वाढवीली, अशी नाहि जागा–
जगीं जेथ डंका न गर्जे रवाने
तुझ्या कीर्तिचा–..भारताचाहि त्याने २७

मळो दे न आदर्श जो भारताचा
जगालागि संदेशही दे तयाचा
कधी दृष्टि अध्यात्म सोडीच ना जो
कितीही वरीं पश्चिमी साज साजो...२८

असे प्राण अध्यात्म हा भारताचा
असे प्राण अध्यात्म तूझे कृतींचा
तयें भारताचा जगीं राजदूत
जगा भारतात्मा सदा दावितोस...२९

न कोठे तुवां नीति धिक्कारियेली
तयें त्वत्कृती मार्गदर्शी जहाली
नरां दुर्बलां हीनतेच्या मधून
सदा ती वरी ओढिते सावरून...३०

कळे ज्यासि घ्यावें त्यजावेंहि काय
न जो वाहवोनी कधी अंध होय
अगा डोळसा, पाहसीही भविष्य
तुला विश्व सारें दिसे एक दृश्य... ३१

अशी बाग तूं लाविली उंच जागीं
सुगंधें भरे मेदिनी सर्वही जी
दिसे दृश्यही रम्य साऱ्या जगाला
असा तूं जगाला अलंकार झाला...३२

तुवां दाविल्या मार्गिं हा देश जावो
तुवां दाविल्या मार्गिं हें विश्व जावो
तुझें काव्य संजीवनी ह्या जगा हो
अलंकार तेजें जगा मार्ग दावो....३३

म्हणोनी तुझा भाट मी आज झालों
कवीन्द्रा तुझ्या दारिं येवोनि ठेलों
स्तवाला तुझ्या नित्य गर्जेन लोकीं
अपूर्वा तुझी थोरवी व्यक्त हो की...३४

तुला वंदितों भक्तिने दिव्य तेजा,
तुला प्रार्थितो आदरें काव्यराजा,
तुझी दृष्टि ती विश्वकल्याणकारी,
मुखें भारताच्या जगाच्या जिव्हारीं..३५

नमस्कार माझा तुला हे कवीन्द्रा
नमस्कार त्या दिव्य ऐशा रसेन्द्रा
नमस्कार त्या मार्गदर्शी कवीला
स्वतेजें तमीं मार्गदर्शी जहाला ..३६

कवींच्या महादर्श ऐशा कवीन्द्रा
कवींच्याहि अत्युच्च ऐशा नगेन्द्रा,
नभा मेदिणाच्या नगेन्द्रा, रसेन्द्रा
तुला भक्तिने वंदितों, मी रवीन्द्रा ..३७

तुला मी नमी वर्तमानामधूनी
तुला मी नमी रे भविष्यामधूनी
तुला भूतकाळातुनी मी नमीतों
तुला काल सोडोनियाही नमीतों ..३८

तुला काल नाहीं, तुला देश नाही
तुला पंथ नाही, तुला धर्म नाही
समस्ताहुनी ह्या वरीं तूं निघाला
जगाला समस्ता अलंकार झाला..३९

स्तवावें किती रे तुला पामरांनी
अम्ही दीन ऐशा वचांनी मनांनी ?
स्तवाला तुझ्या दिव्य तूझीच वाणी
हवी होति कौशल्य-सौंदर्य खाणी..४०

नमस्कार सौंदर्यखाणी तुला हा
नमस्कार द्रष्ट्या तुला आज घे हा
नमस्कार आदर्श ऐशा कवीन्द्रा
नमस्कार माझा तुला हे रवीन्द्रा .. ४१

कवे, शिक्षणज्ञा, जगत्कार्यकर्त्या,
अगा देशभक्ता, सदा हे अमर्त्या,
ऋषे, ध्येयवादी सखा पामरांचा
नमस्कार माझा नभोराज्यराजा .. ४२ ..

✕ ✕

# गिरीश

## गुरुदेव रवींद्र
( जाति-मंजरी )

तुज फुलाफुलांतुन सुगंध नव लाभले,
त्यांतुनी पीक तूं नदितीरीं पिकविलें,
सोनेरी नौकेंतून धरेला दिलें....१

तूं निर्झर-ओढे महोदधींतिल जल,
निज मंत्रोच्चारें तीर्थ करूनि मंगल,
शमविलें धरेला होतां ती व्याकुल,...२

तुज कोमल किरणें सोनेरी गवसलीं,
मृदु हातें त्यांची विणुनी वसनावली,
हळुवारपणें तूं दीन धरा झाकिली,...३

तव करा लागले दंवबिंदू हासरे,
तेजाळ बनवुनी त्यांचे माणिक हिरे,
चमकवुनि आपल्या तूं भूषविलें धरे,...४

तरुडोंगर-मेघांवरी रंग बहरले,
घेऊन मनोहर कांहीं त्यांच्यांतले
सौंदर्यें कोमल देतीं तव कुंतले,....५

वाणीस करूनी चंद्रकला शीतळ
वर्षून तियेंतुन भावकिरण निर्मळ,
तूं धरेस दिधलें ध्येय नवें उज्ज्वल..६

स्वर-भाव कोवळे वेचुन विश्वांतले,
भारतीय वीणेवरी तुवां छेडिले,
अन् गीतांजलिने धरेस या निववि़लें...७

जन्मून भारतीं किमया केली तुवां,
तूं गुरुस्थान दाविलें अखिल मानवा,
गुरुदेवा, यास्तव देते धरणी दुवा...८

हा हाय परी ती गभीर तेजस्विनी,
पाहिली जवळुनि मूर्त अमृतवर्षिणी,
दिसणार कशी, अन् सुधा सवे कोठुनी...९

✻

## रवींद्र गीत

भिक्षा मागत भटकत होतों गांवांतिल मी पथीं,
तोंच पाहिलें तुला आपुल्या सुवर्णसुंदर रथीं...
अपूर्व दिसलें डोळ्याला तें दृश्य स्वप्नापरी,
अपूर्व शोभा किती त्या साजश्रृंगारांभीतरीं,
महाराज हे कोण, कोठले? भावलेंच अंतरीं,
मनास वाटे, शुभ क्षणिं या सरली मम दुर्दशा,
दारोदारीं अता फिराया नकोत चारी दिशा
पाउल पडलें बाहिर तों हें मंगल दर्शन घडे,
चलित रथांतिल धनधान्याचा निधि मजला सांपडे,
भरभरुनिया मुठी, राशि वा नेइन सदनाकडे,
सहज पाहिलें तों रथ आला जवळ, पुढें ठाकला,

उतरून खालीं मजकडेस तूं हास्यकिरण फेंकला,
प्रसन्नता तव पाहुन, सगळी गेली माझी व्यथा,
'दैव उदेले,' गमे हात तों पसरूनि तूं सर्वथा,
म्हटले—'द्याया तुजजवळी मज काय असे तें अता'!
'कसली थट्टा महाराज ही! हाय,' वदे, तों पुन्हा
तीच मागणी! शिर नमलें मम! लज्जा वाटे मना!
तुजपाशीं कीं अभाव? भिक्षुक ये वा भिक्षुकुघरी,?'
वदतां कुतुकें तूं मज वाटे प्रवंचना अंतरीं!
झोळींतिल मीं एकच दाणा ठेवियला तव करीं,
घरास येतां झोळि रिकामी केली भूमीवरी,
ढिगांत दिसला सोनेरी कण एक अकस्मात् वरी!
राजभिकारी तूं, तुज कणिका एक सान मीं दिली!
स्वर्णरूप ती परते पाहुन नयनें पाणावलीं,
म्हटलें दुःखें—झाडुन झोळी कां न तुला अर्पिली.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थल
अनुक्रम 38204 वि:
क्रमांक 9585 नों. दि. 25

## सोनार तरी

गगनीं गरजे मेघ, सांडे वर्षा,
एकटा मी तटीं बसे, नाही भरोसा,
राशी राशी, भारे भारे—
कापले हें धान सारें.
नदी भरे महापुरें,
पूर क्षुरसा,
कापतांना कोसळला पाऊस कसा ...१

छोटेखानी शेत माझें, मी हि एकला,
घुसून हें पाणी आंत, खेळे भूतलां,
पैलतिरीं सुरेखसें-
छायेमधे गांव दिसे,
तरूमेघीं झाकलेसें
पहाट वेला,
ऐलतीरीं छोटें शेत, मी हि एकला...२

गाणें गात वल्हवीत कोण येइ तें ?
पहातांच ओळखीचा असे, वाटतें,
शिडें किती फुगलीं हीं,
आंत कांहीं तो न पाहीं,
दुभंगतें निरूपायीं,
नाव लाटांतें, पाहातांच, ओळखीचा असें न वाटतें...३

" अहो, तुम्हीं कुठं जातां ? कोण्या देशाला ?
जरा थोडी लावतां का नाव तीराला ?
खुशाल जा इष्ट गावीं,
खुषी असेल त्या द्यावी,
फक्त घेऊनी ही जावी
सोनेरी कला,
धान-माझं हंसत न्या, या या तीराला...४

धान हवं तेवढं घ्या, नावेंत ' भरा, '
आहे आणखी का ? –" नाहीं ! दे निघिपुरा !"
आजवर मन धालें,
संगे अन्य विसरलें

रचुनी हे थर दिले,
दिला आसरा!
आता मला नावेंत घ्या करुणाकरा!" ...५
जागा नाही! जागा नाही!! छोटी असे नाव!
सोनेरी धानाने भरें! आता नाही वाव!
श्रावण आकाश भरीं
घोर वर्षे धारा सारीं,
शून्य मनें नदीतीरीं
सोशीतसे घाव्,
घेऊनिया गेलीं सारें सोनेरी ती नाव...६

✕

नव वर्षा

हृदय आज हें बेहोष नाचे रे,
मोरापरी धुंद नाचे रे, हृदय नाचे रे..
शेकडो रंग हे भावउच्छ्वास,
पावती कलापी पंख विकास,
व्याकुळले, प्राण आकाश पाहूनी
उल्हासें तयास याचे रे,
हृदय आज हें बेहोष नाचे रे
मोरापरी धुंद नाचे रे......१
धुर्धूर, कडाड! धुर्धूर कडाड!
मेघ हे गर्जती गगनीं, गर्जती गगनीं,

दौडत पातल्या बादली या धारा,
उडतीं नवीन बीजें हीं तरारा,
कातर कपोत कांपती कोट्यांत,
दर्दूर कर्कश रटुनी,
धुर्धूर कडाड, धुर्धूर कडाड,
मेघ हे गर्जती गगनीं......२

श्याम जलदांचें नव कृष्णांजन
भरलें माझिया नयनीं, भरलें नयनीं
नव तृणदलीं, घन छायातलीं,
कुणाची हृदयवृत्ति विसावली,
पुलकित नीपनिकुंजी, विकच
प्राण जोगावले हर्षूनी !
श्याम जलदांचे नव कृष्णांजन,
भरलें माझिया नयनीं......३

अहो, प्रासादांच्या शिखरीं कुणाचें
घन कृष्णकेश सुटले, कबरींतुनीं सुटले
अहो, नव घन सुनीलवसन,
वक्षावरी कोण घेतसे ओढून,
तडिल्लेखेच्या या चंचल दृष्टींत
कोण हें खेळत डोललें ?
अहो, प्रासादाच्या शिखरीं कुणाचे
घन कृष्णकेश सुटले ?......४

आणि नदीतीरीं तटतृणावरी
कोण शुभ्रश्यामवसना ? शुभ्रश्यामवसना ?

सुदूर नभीं ती न्याहाळी काय !
घाटघडा कुठे वहात जाय ?
नव मालतीचे कोमल - दल हे
कुठली कांपिते दशना ?
आणि नदीतीरीं तटतृणावरी
कोण शुभ्रश्यामवसना ? .......५

अहो, निर्जनीं या बकुलशाखेच्या
झुल्यावर कोण झुललें ? कोण झुललें ?
झर्झर बकुल पाखरण करी,
अंचल आकाशीं आकुल अंतरीं,
अलक उडाले, निमिषीं जहाले
कबरीचे केश हे खुलें
अहो, या निर्जनीं बकुलशाखेच्या
झुल्यावर कोण झुललें ?......६

विकच केतकीवन तटा कुणीं
बांधिली तरुण तरणी ? तरुण तरणी ?
शेवाळाच्या भरभरूनिया राशी -
चंचल अंचलीं कोण नेई, कशी ?
बादलरागिणी, सजलनयनीं,
कोण गाई प्राणहरिणी ?
विकच केतकीवनतटा कुणीं
बांधिली तरुण तरणी ? ...७

हृदय आज हें बेहोष नाचे रे,
मोरापरी धुंद नाचे रे, हृदय नाचे रे

झरे घनधारा नव पल्लवी,
कांपते कानन झिल्लीच्या रवीं
कलकल्लोळांत लपे नदीतीर
आणि खेडें कुठे दिसेनाच रे,
हृदय आज हें बेहोष नाचे रे,
मोरापरी धुंद नाचे रे, ...८

✿ ✿

## मनामनावर राज्य करी जगिं रवींद्र-कवि-कल्पना

[ श्री. रवींद्रनाथांच्या एका लहान कवितेंतील महान कल्पनेनें, जगाला मृत्यु-भयापासून मुक्त केलें आहे. आई मुलाला पाजते. पाजतांना या अंगावरून त्या अंगावर घेते. या उगीच अंतराचे, मध्यंतराचे, मृत्यूचे जगन्मातेच्या मुलाने, जीवात्म्याने, कां म्हणून भय बाळगावें? ]

नकाशांत या असोत कितिही राजवटीच्या खुणा
मनामनावर राज्य करी जगिं रवींद्र-कवि-कल्पना

×

बडेजाव जरी जगिं देवाचा थोर तयाचा पिता
आदि कवी भूदेव तोच या विश्वाचा जाणता
अनादिनिर्गुण नांव मुलाचें ठेउनि एके दिनीं
आदि कवी तो मुक्त जाहला या संसारांतुनी
देवाजीचें राज्य अलौकिक राजवटीची तऱ्हा
बघुनि लोचनीं मुक्त महात्मा अंतरिं हो घाबरा
देव जिवाला दुरावला कां जीवन वेडे खुळे
प्रजा प्रजापति केवि जन्मले जन्माचे आंधळे
कवि देवाचा देव दयाळू लेववि ज्ञानांजना
मनामनावर राज्य करी जगिं रवींद्र-कवि-कल्पना

×

राजविलासी देव तयाची अर्धांगी लक्षुमी
राजाराणी राज्य तेथल्या सुखा न कांही कमी
सुखासीन तो देव भूवरी एकलकोंडा बने
चंचल लक्ष्मी जगूं लागली अति स्वच्छंदी जिणें
राजलक्षुमी म्हणूनि प्रजा जरि नित्य वंदिते तिला
परंतु नव्हता तिच्या अंतरीं जीवाचा कळवळा
तो आणिक ती पुरुष प्रकृती संसारीं दुर्दशा
नको सांगणें दुःख तेथल्या प्रजाजनांना पुसा
प्रीति फुलेना कधिं संसारीं दुःख साहिल्याविना
मनामनावर राज्य करी जगिं रवींद्र कवि-कल्पना

×

विश्वविहारी प्रकाशवारा जीवनधरणीवरीं
तो धरणीधर देव असावा जीवांच्या अंतरीं
कां भूवरती त्या देवाचें सिंहासन तें रितें
जा कविते बघ विघ्न जीवनीं उद्‌भवले कोण ते
जिती जागती ज्योत प्रीतिची कविता कवि कन्यका
सुखें शोधिते देवाघरच्या हारपलेल्या सुखा
देवदेवता जिवा विसरल्या जीवन शेवाळलें
विश्व सुखाचें स्वप्न भंगलें या दुर्दैवामुळे
जीवजगाचा स्फुरे मंत्र मग स्वधर्म शुभ कामना
मनामनावर राज्य करी जगिं रवींद्र-कवि-कल्पना

×

देव कवीचा धर्म कवीचा कवि जीवाचा सखा
प्रभाव त्याचा स्वभाव सुंदर रवि-तेजासारखा

गीत रंगलें नृत्य रंगलें चित्र रंगलें भलें
रवि-तेजाने जडजीवांचें जीवन शृंगारले
प्रसन्नतेने जना न्याहळी कविता विद्युन्नटी
तिथे न राजा तिथे न राणी राज्याच्या चौकटीं
जनीं जनार्दन जनार्दनाचें दर्शन चोहीकडे
तिथे पडेना कधीं कुणाचें पद वेडें वाकुडें
जीवन साथी मृत्यु जीववी सद्गुण सद्भावना
मनामनावर राज्य करी जगिं रवींद्र-कवि-कल्पना

×

प्रीतिमुळे जगिं जन्म, मृत्यु हा जन्माचा सोबती
जन्म-मृत्युची जगज्जननिच्या कुशींत सुखसंगती
बाळ जन्मलें जीवन फुललें सवेंचि पान्हा फुटे
जन्मसिद्ध हा हक्क तियेच्या स्तनास्तनाला झटे
इथेहि अमृत तिथेहि अमृत उगीच अंतर मधीं
उगीच अंतर मृत्यु जाणवी जीवन अमृत–निधी
ही निर्भयता प्रसन्न कविता प्रसन्न जीवनकळा
जगीं फुलविते आत्मसुखाचा आनंदाचा मळा
देव गुरु कवि धर्मगुरु कवि ' जनगण ' गुरुदक्षिणा
मनामनावर राज्य करी जगिं रवींद्र-कवि-कल्पना

✕

## निसर्गगीता

[ श्री. रवींद्रनाथांना पुराण कथांवर, नैसर्गिक घडामोडीचा आरोप करण्याची आवड होती. त्या आवडीचें अनुकरण म्हणून ही कविता सुमारें तीन तपापूर्वीं लिहिली गेली. या कवितेंत सूर्यास्तापासून सूर्योदया-पर्यंतच्या नैसर्गिक घडामोडींवर, पुराण ग्रंथांतील भगवद्‌गीता जन्मकथेचा आरोप करण्यांत आलेला आहे. ]

पूर्वदिशेच्या पलीकडे, अंधाराचें उभें कडें
दिनरजनीचा संग्राम, साक्षि तिथें मेघःशाम
काळोखाला जाळूं कसे, दिनमणि मानसिं भरे पिसे
कर सोनेरी
त्यजुनि भूमिवरि
म्हणे रण न करि
बघुनि भानुशर संन्यास, करित नीलभव उपहास

×

काळोखाचा तूं शास्ता, जगताचा जीवनदाता
आपुलकीचीं रडगाणीं, कशि सुचली तुज रणांगणीं
तो न आजचा तूं न नवा, अनादि दोघांचा दावा
अपूर्ण नश्वर
पूर्ण निरंतर
युद्धचि तोंवर
जीवन भरलें कलहानें, मृत्यू म्हणजे द्वैत उणे

×

चंद्र चांदण्या अगणित या, वितरति अनंत सौंदर्या
विश्वसिंधुतिल बिंदु जणूं, पूर्णत्वातिल परमाणू
प्रतिसृष्टीचे सूर्यचि ते, परिव्यापक मी इथे तिथे
तेज तिमिर ही
एके ठाई
बघ लवलाही
शाश्वत मंदिर शांतीचें, अस्तित्वाविण उरण्याचें

वा. क्र. 12-699

×

मुळिं नुरणाऱ्या काळोखा, चिरंजीव पद देशिल कां
भ्रमशि जसा तूं मोहवशे, अस्तित्वहि तव क्षणिक तसे
जगणें मरणें आणि उरणें, मग मज माजीं अनुसरणें
धर्म रक्षणा
करि रणयज्ञा
समर सुजाणा
शांति हवी तर युद्ध करी, ना तरि रौरवनरक वरी

×

विश्वरूप दर्शन घडलें, ज्ञानांजन नयनीं पडलें
शस्त्र सावरित प्रभाकर, वीर विजयि रण धुरंधर
निसर्गगीता गात उषा, हर्ष उधळिते दाहि दिशा
कुंजविहारी
मनो मंदिरीं
गीत नृत्य करि
आनंदी आनंद गडे, इकडे तिकडे चोंहिकडे

✕ ✕

अगा रवीन्द्रा, गुरुदेवा,

लंघुनि काळाच्या सीमा
कितीक केलीं त्वां भ्रमणें
खुडुनि आणिलीं नवीं नवीं
कल्पलतेवरलीं सुमनें

भय कोमेजुनि जाण्याचें
नाहीं ज्यांना कल्पान्तीं
आणि निरंतर ज्यांमधुनी
सुगंध-वीची दरवळती

गंधवीचिवरि उभारिले
स्वप्नांचे प्रासाद तुवां
भविष्यासवें जोडितसे
वर्तमान ज्यांमधुनि दुवा

त्या प्रासादीं सत्याला
वावरतां संकोच नसे
मान न मिंधेपणीं लवे
निर्भयता चित्तांत वसे

ज्ञानसाधनेप्रति न जिथें
येइ आडसर कसलाही

शब्दोच्चारांतून मिळे
न्यायाची जेथें ग्वाही

स्वप्नांचा प्रासाद असा
नव्हे, अहो तें विश्व नवें
पंख पसरुनी भरारती
पक्ष्यांचे ज्यांतले थवे

पूर्णत्वाचा लागुनिया
एकसारखा वेध मना
सावधतेनें अनुसरतां
मांगल्याच्या श्वेत खुणा

×

तव दौतीमधिं विरघळले
श्रुतिस्मृतीसह वेद जणुं
आणि अक्षरांतुनि नटलें
उपनिषदांचें इंद्रधनु

इन्द्रधनूंतुन रुणझुणले
सरस्वतीचे पैंजण कीं
अशी तुझी संगीतमयी
नर्तनपटु कविताच निकी

तिच्या पदन्यासांमधुनी
कारंजें जें उफाळलें
मूढा गति चैतन्य मिळे
थयथयत्या सिंचनामुळें

×

महामानवास्तव होता
ध्यास घेतला तुवा महान
त्याच आर्तिनें कळवळले
प्राणापान – व्यान – उदान

गंगेच्या तीरावरूनी
हांक तुझी ती निनादली
हिमाद्रिच्या शिखरावरुनी
पुकार – वाणी दुमदुमली

परि हांकेला त्या पुरती
हाय, येइना अजून साद
यज्ञवेदिच्या सभोंवती
माजे नुसता वादविवाद

अनेक संस्कृति – सरिता ह्या
संगमल्या भारतीं जरी
अजून मंगल तीर्थांनीं
कलश न भरला पूर्ण परि

म्हणून आमंत्रितों तुम्हां
अगा, कवींद्रा, गुरुदेवा
महामानवास्तव तुमचा
ध्यास पुन्हा ललकारावा

## अखेरगीत

शांत पसरला सागर पुढतीं
वल्हवि नौका अतां नाविका
घे हा जन निज अंकावरती
तूंच निरंतर अतां प्रियसखा ॥ वल्हवि० ॥

अनंताचि या पथीं तेवते
पहा ध्रुवाची पुढें तारका
तव दयालुता, क्षमाशीलता
या चिर यात्रेमाजी पथिका
अक्षय धन हे मुक्तिदायका ॥ वल्हवि ॥

बंध येथले तरि हे गळुनी
ब्रह्माण्डाच्या मिठींत रिघुनी
हा जन निर्भय चित्तीं घेवो
जाणुनि त्या अज्ञात नायका ॥ वल्हवि० ॥

✗

## नाहीं उत्तर

जीव नवीनच जन्मा आला
पाहुनि पहिल्या दिवशीं त्याला
प्रश्न करी दिनमणी स्वभावें—
" बाबा, कोण तूं तरी ? "
नाही आलें परंतु उत्तर

वर्षामागुनि वर्षें गेलीं
गंभीर पश्चिम सागर तीरीं
दाटुं लागतां संध्या-छाया
अखेरचा दिनमणी ठेपला
प्रश्न विचारित अखेरचा कीं
"बाबा कोण तूं तरी ?"
तरिहि मिळालें नाही उत्तर.

✻

## भ्रम झुगारुनी दे

कां कवळुनि बससी भीति उरीं ?
भ्रम झुगारुनी तो देइ दुरी
खुलीं तरिच रे दारें होतिल
तुटतिल सारे लंगर खळखळ
विजयाचा जरतारी मंदिल
झळकेल आणि तो तुझ्या शिरीं

तव निद्रेंतिल बेसावधपण
स्वत्व-हानिला तुझिया कारण
पुन्हः पुन्हा परि जागृत होउन
हारपल्या श्रेया आण घरीं.

ऐक, हाक ये तुला नभांतुन
देइ धरित्री सादहि खालुन

हाक फुटे जनसंमर्दातुन
सुख-दुःख-गान ऐकवी तरी
पल्लव, पुष्पें, जीवननिर्भर
कोसळते खळखळते निर्झर
म्हणति लागुं दे तुझा असा स्वर
लय प्रकाश-संध्येपरी धरी

✠ ✠

# प्रा. भवानीशंकर पंडित

## जीवन आणिं मरण
( दोन आवाज )

[ जीवन आणि मरण हीं त्या जगज्जननीचीं दोन स्तनें आहेत. जीवाला ती एका स्तनाकडून दुसऱ्या स्तनाकडे नेतांना तो क्षणभर रडतो येवढेंच ]

**आवाज पहिला**

" हे मित्र मृत्यो शेवटीं तूंही मला अज्ञात ना ?
निघतांच नांव तुझें सुटे थरकांप शब्द फुटेच ना ?
जग सोडतांना आंसवें भरपूर खळखळ वाहती
मारी जिण्याला घट्ट मी बाहूंत कवळोनी मिठी "

**आवाज दुसरा**

" मूढा तुला अज्ञात जग जन्मा अगोदर पासुनी
तुज ठाउकें कां रक्षिलें तेव्हां तुला त्याला कुणी ?
येतांच सन्निध मृत्यु, तुज 'मुद्रा' दिसेल अनोळखी
तुजला पटेल परी तिची निमिषींच एका ओळखी
प्रिय जेवढें जीवन गमे आतां तुला वेड्या अरे
तें मरणही मग तेवढें वाटेल प्यार तुला बरें
एका स्तनाहुन मूल जें नेतांच दूर, रडे भयें,
तें लागतांच दुज्या स्तनीं निश्चिन्त निर्भय हो स्वयें "

## लावण्य-लतिका

[ प्रसाधनविहीन साधें सौंदर्य हें मनाला अधिक चंचल करतें. ]

नच केस विंचरिले तिनें, नच माळिलीं कुसुमें वरी
ते सैल केवळ बांधिले देती तिला शोभा तरी
अथवा न काजळ घातलें नयनीं सलज्ज तिनें जरी
साघात हृदयद्वार ते ठोठावती ठकठक तरी
आकूल अंचल फडफडे खांद्यावरीं पाठीवरी
कीं पाश पथिकाच्या पदीं तो फांदला जीवनभरीं
तंटा बखेडा त्यासवें केला न, रचला व्यूह ना,
पण डाव गुपचुप साधला ऐशी तिची संयोजना
लेंतां न लेणें एकही अगदीं सिधें-साधेंपणीं
लावण्यरूपें आपल्या टाकी तया ती वेधुनी
निज लोल दृक्कोणांतुनी ह्यासून केवळ पाहिले
हृदयास चंचल त्याचिया सहजीं तिने किति विंधिले

✲

## सिंधुमाता व पृथ्वीदुहिता

[ 'सागरिका' ही 'पृथ्वी' या आपल्या लाडक्या कन्येशीं कौतुकानें खेळत असते. त्या सृष्टिसौंदर्याचा आनंद या कवितेंत ओतप्रोत आहे. ]

अंकावरी, स्कंधावरी, वक्षावरी लोळे तुझ्या
हे आदिजननी 'सिंधु'! ही पृथ्वी त्वदीया आत्मजा
ती लाडकी एकूलती लागे तिची चिंता तुशीं

डोळ्यास डोळा ना! सदा अस्वस्थ चंचल तूं अशी
हुलकावणी दावून तूं लटिक्या मिषें जाशी दुरी
एकेक पाऊल आपुलें मागें किती नेशी तरी
जणुं काय दुहितेपासुनी तुज वास दूर गमे बरा
तितुक्यांत पण तूं परतशी काढीत सानंद स्वरा
सोत्साह नाचत सारखी सोल्हास करिशी गर्जना
हृदयीं उचंबळुनी त्वरें तूं धाव घेशि पुन्हापुन्हा
सप्रेम घालुन झोंप तूं पृथ्वीचिया अंगावरी
गालास लावुन गाल तूं तिज घ्यावया झटशी उरीं
आनंद कोंदानी तदा तूं शुभ्र खदखदा हासशी.
निमिषीं ललाट तिचें तुझ्या आशीजलें अभिषिंचिशी.

✻

## दादाचें ज्योतिर्ज्ञान

[ लहान मुलांचें निरागम व निष्पाप अज्ञान ]

कदम्बफान्द्यांचीं जाळीं
त्यांत दिसे सायंकाळीं
चांदोबा अडकुन बसला

म्हणुन पुशी मी दादाला,
दादा दादा, सांग मला
धरतां येइल कां त्याला ?

खो खो खो हासत दादा
वदला, " वेडा रे वेडा

त्या फान्द्यांपासुन चंद्र
कितीतरी आहे दूर !"
मीं म्हटलें, "दादा कांही
कसें तुला समजत नाहीं,
खिडकीच्या जाळीमधुनी
आइ बघे जेव्हा हसुनी
तेव्हा असतें काय बरें
दूर इथुन ती फार ? अरे !"
हसुन म्हणाला मज दादा,
"वेडा रे, पुरता वेडा !"
दादा वदला पुन्हा मला,
"चांदोबाला धरायला
हवे फार जाळें मोठें
मिळेल कोठुन तुजला तें ?"
मीं म्हटलें, "दादा, कांही-
चांदोबा मोठा नाही,
ओंजळींतही राहिल तो."
हासत हासत खो खो तो
पुन्हा म्हणाला मज दादा,
"वेडा रे, पुरता वेडा !
चंद्र जवळ जर कां असता
तर असता दिसला मोठा."
मीं म्हटलें, "दादा, तुजला

हेंच शिकविते कां शाळा ?
वाकुन आई घेइ मुका
तोंड तिचें हो मोठें कां ?"
हसत म्हणाला मज दादा
" वेडा रे, पुरता वेडा ! "

✠ ✠

रा. अ. काळेले

मराठी ग्रंथ संग्रह
अनुक्रम 38265 विः
9565 नों दि 24-


## गावयाचें गीत माझें...

(' The song that I came to sing remains unsung to this day '
Gitanjali, 13 )

गावयाचें गीत माझें गाइल्याविण राहिलें
अंकिं वीणा धरुन मी ताराच जुळवित राहिलें
सम ठरे ना, विषम या शब्दांत नुमटे गान तें
फक्त ही ओढाळ इच्छा अंतरां कळ आणतें
उघडली नाही कळी, न कळे तदन्तर वास तो
बाजुला अस्वस्थ वारा उगिच मात्र उसासतो
पाहिलें मीं मुख न त्याचें नोळखीते शब्दही
हळुं कुठे वाटेंत चाहुल वाटते त्याचीच ही
सांडला दिन संथ, त्यास्तव अंथरीतां आसना
लाविल्याविण दीप, वेडी होइ त्याच्या दर्शना
कधीतरी भेटले तो – आशेंत ऐशा राहते
भेटला न कधीच तो, तरि वाट नुस्ती पाहते...

×

## दासावर करुणा करि राणी

('Have mercy upon your servant, my queen' Gardener, I)

**सेवक**

दासावर करुणा करि राणी

**राणी**

सभा संपली आणी
निघून गेले सगळे सेवक,
विलंब झाला केवी?

**सेवक**

विसर्जिल्यावर सर्वांना तूं, देवी!
होते माझी वेळा,
मग शेवटला सेवक ठाके हा पुढतीं नमलेला.
आज्ञा प्रार्थी उरल्या कामा . . .

**राणी**

. . . काम कशाचें, इतक्या विलंबकाळीं ?

**सेवक**

कर मजला तूं अपुल्या फुलबागेचा माळी

**राणी**

भलतें ! . .

**सेवक**

सोडिन दुसरीं काजें
मोडिन खड्गहि माझें . .
फेकुन देइन तुकडे केरावारी . .

नको पाठवूं मला दूर दरबारीं
सांगु नको मज गाजवावया
संगर विक्रम-शाली
फक्त मला कर अपुल्या फुलबागेचा माळी !

**राणी**

काम तुझें ? . .

**सेवक**

तवं रिकाम-सेवा . .
पसरिन हिरवा दूर्व-पथ तुज प्रात संचाराया
असतिल उत्सुक सुमनें
सुरभि-स्तवनें गाया
पदोपदीं, तव पायां
आतुर चिरडुन जाया . .
. . करिन तुला मी सप्त-पर्ण- शाखांवरती हिंदोळा
चांद तरूण सांजेचा
गडद गडद पानांतुन झगडत
चुंबिल तुझिया घोळा
. .स्नेह सुवासिक भरीत समइंत तुझ्या उशाशीं
आणि चितारिन पाद - पीठ तव नवल-बुटींनी
वांटुन चन्दन-केशर-गोळा...

**राणी**

इनाम या कामाचें ?. . .

**सेवक**

...अमल प्रभाती-कमल-कळी-सम
        हे तव हात धरूं दे !
त्यांवर फुल-कांकणें भरूं दे !
अशोक-कळिच्या रक्त-रसें
        पद-तल रंगूं दे !
मी सारिन गे, त्यावरला रज-लव
        ईषत् चुम्बुन

**राणी**

...मान्य प्रार्थना झाली !

        प्रिय भृत्या...
मी केलासे तुज माझ्या फुलबागेचा माळी...
जगा ! मी फूल तुझें तोडलें
रुपला काटा
फूल जधी तें हृदयाशी जोडले....
हळुहळु दिवस जाय ओसरुन
भळभळा तिमिर येतसे भरुन
फुल कोमजलें...
कळ त्याची पण ताजी आहे अजुन...
येतिल कितिल फुले तरि जगा
दर्प अति दरवळेल झगमगा

        परी...मम समय संपला मघा !
रातघडिस तो गुलाब माझा नुरे...

ही व्यथाच केवळ उरे,
पिळुन चित्त ओढलें
चित्त ओढलें...

✻

## आला श्रावण

आला श्रावण

छेडत कोमल विचित्र-वीणा जल-धारांची
गंध-वसन केतकिचे फेडत, झेलत नभ-मोती
नाचवीत भोंती प्रियदर्शन मुग्ध मेनका हिरवाळीची
मौजेची उडवित कारंजी
तेरडा नि तगरीशी घालत रुंजी
पुष्पितशा रंगीत भावना खुलवित आला
घालत रस्त्याच्या कंठी जल-माला
घडवित मधु-संगम हृदयंगम जळ-मातीचा
नवपातींचा आला श्रावण
पसरुन पंजे मोरपिसांचे, आकाशाचे शिंपत अत्तर
लिहीत सुंदर वेल-पत्तिच्या वक्रोक्तीच्या हिरव्या कविता...
ठिबकवीत वळचणिचे पैंजण
तारेवर लटकवीत ओले उत्कंठित थेंबांचे डोळे
चाळवीत इच्छांचे बुद्बुद, खुदुखुदु हसरा
परीपरीच्या वेलबुटींचा, मण्यामण्यांचा
रमण्याचा...रमण्यांचा...

बहारिचा चमकदार ताजा
श्रावण राजा...
रिमझिम चरणांचा, आभरणांचा
चुंब प्रीतिचा, चिंब रीतिचा
ओलेत्या भिजत्या भेटींचा
चारुदत्त नी वसंतसेना यांचा प्रियतम
बिरहीको तरसानेवाला . . झडीझडी बरसानेवाला
आला श्रावण . . आला श्रावण . . .

※

## वारा

आला ओढीत ओढीत वारा
तुझ्या पदरानं सोडला थारा
नाच भरून बिथरल्या लाटा
लाल मुरुमावर मोडल्या वाटा
झोके खाई गोईचा किनारा
पांढऱ्या चाफ्यानं टाकली चूळ
करवंद काट्यावर फिरली भूल
हिरव्या बोरींच्या लागल्या हारा
अंजनपाल्याचा डोईवर भार
गळां गळसर रुळे भरदार
सातपुड्याची टोकं टोकं बारा
नितळ तनू तकाके काळी

लालचुटुक ओढणी ल्याली
निळ्या भाळावर गोंदल्या तारा
श्रावण फैलावला जरतारी
कां ग थबकली तूं मिल्लनारी ?
तुटल्या कड्यावर बिजली धारा
सातारंगांचे झंकार झाले
तूझ्या नजरेतून सारंग हाले
काळ्या ढगाचा ठिबकला पारा
ओल्या खडकाच्या फुटल्या पाळी
झुके गर्वाचं आभाळ खाली
तुझ्या पायाशी दबला चारा

✕ ✕

# सोपानदेव चौधरी

## नाविक गीत

धुंद दिशा चोहिकडे तुफानाला नशा चढे
जाऊं दे रे होडी पुढें. नाखवां,
दमछाटि पाल ओढ
मीहि उभारितो शीड
हाण जोर ताण दोर, हाइओ हाइओ..१
झणकत वारंवार, शृंखला झणकार
हे तर होडीचेच करुण पुकार,
तुटे न बंधन, अंतरिं क्रंदन
होडि माझि तूंच सांभाळ रे
हाण जोर ताण दोर, हाइओ हाइओ..२
दिन दिन क्षणक्षण चंचल करि मन
शंकित जाऊं किं न जाऊं रे
संशय-सागर अंतरिं होइ पार
उद्वेग कां मग मनिं रे
जरि माजे महाकाल, उद्दाम जटाजाल
निर्भयता तुज देत दिव्य बल.
काय तमा मग मत्त सिंधुची
धुंद गीत तूं गाई रे
हाण जोर ताण दोर - हाईओ हाईओ..३

## नयन तुझे सांगतात

नयन तुझे सांगतात, गाइ गोड गाणें ॥ धृ ॥
वरचेवर वरचेवर—
प्रकाश आणि अंधकार
दिवस रजनीचे अंतर
उभयांच्या सीमेवर
फुलांफुलांत गूज कळे, मजसि इषाऱ्यानें १
काय तुला विदित न कां ?
काय कथू आकुलता
लोपली व्यथेंत कथा
विरले स्वर उरले रे भ्रांतिचे तराणें २
हांक येत नौकेतुन
झडतुफान मेघांतुन
त्या गंभीर स्रोतांतुन
साद देत मरणाला, श्रावणी झडीनें ३
येथें मी नदिकाठीं
तिष्ठत रे तुजसाठीं
तुजकडेच नित्य दिठी
पथ हा तव जात कुठें ? कुठें कोण जाणे ४
साद देत असिम नभा
बघण्या तव दिव्यप्रभा
एकटाच येथ उभा
वाट बघत लोटलि रे, अयनावरि अयनें ५
नयन तुझे सांगतात गाइ गोड गाणें

✻ ✻

## ना. घ. देशपांडे

### रवींद्रास

कटीवर घट अशी सुकुमार पोर,
झडीचा पाऊस आणि रम्य अभिसार,
घरोघरीं चाललेल्या सुखदुःख कथा,
मनोरम बनलेली हृदयाची व्यथा
दूरचा किनारा, नदी उचंबळणारी
समय उत्सुक अशी नाव नाचणारी
मधुर रहस्यमय श्रावणाची रात,
पथिक विहीन पथ एकटाच पांथ
मेघावर मेघ आणि वादळाचा वारा
दारी उभा असलेला वाट पाहणारा
दुपारची वेळ आणि पाखराचें गाणें
आडावर निंबांवर हलणारीं पानें
अहो भव्य कारागीर, स्वप्नाकार अशा
विश्व-हृदयांत तुम्ही काढलेल्या रेषा !
चिरंतन बनलेले असे नानाकार
कोण पुसणार आणि कसे पुसणार ?

## रवीन्द्र गीत

भडकला प्रलयाग्नि कडाड पडले तरुच रात्र वैराची
फडफडून पाखरें खालीं पडलीं लागून धग खैराची
उग्र वास आणि धूर थयथयलीं पाऊलें रानवाऱ्याची
सरत आलेली रात्र आणि शिणलेले गात्र सारें उदास
आणि भूमिवर खालीं जळतात, रूप रंग आणि सुवास
आहे विफलता सारी नाही उरलेला कांही कुठें उल्हास
उरलेल्या कोटरांत अनगिनत झुरले चिरविरही
दिसणाऱ्या संहारांत खालीं पडून विरते दहिवरहि
येते क्षितिजाची रेषा गहिवरते मानस पण तरींहि
कुठेतरी उरलेल्या जळकट फांदीवर काही नसून
मरणाच्या वाऱ्यावर गीत जीवनाचें गातो पक्षी सूबन
पुन्हा फुलतात फांद्या तेज हळूवार येते रसरसून

✕

## स्वप्न

दूर बहु दूर
स्वप्नलोकीं उज्जयनीभर
एकदा धुंडत गेलों क्षिप्रानदीवर
माझी पूर्व जन्मांतली पहिलीच प्यार.
मुखीं तिच्या लोध्ररेणु-, लीला पद्‌म हातीं
कानामध्यें कुंदकळी, कुरूबक माथीं
नेसलेली लाल वस्त्र घट्ट नीरगांठ

रुमझुम वाजणारे नूपुर पायांत.
वसंताचा दिन
हिंडलों मी बहु दूर पथ ओळखून
महकाल मंदिरांत होती
त्या वेळीं गंभीर मंद चालू संध्यारती
जनशून्य होते हाट दिसले अन् वर
अंधःकार वाडयावर संध्यारविकर.
प्रियेचें भवन
बंकिम संकीर्ण पथीं दुर्गम निर्जन
दारीं नम्र शरंचक त्याच्या दोहीकडे
सान कदंबाची जोडी पुत्रस्नेहे वाढे
कमानीच्या श्वेतस्तंभाआंत
सिंहाची गंभीर मूर्ती कसली उन्मत्त !
प्रियेचे कपोत सारे घरीं परतले
सोनियाच्या दांडीवर मोर झोपलेले
अशा वेळीं हातीं दीप-शिखा
हळूंहळूं खालीं आली माझी मालविका
दिसली पायऱ्यांवर दरवाजापाशीं
सायंतारा धरलेली सांध्यलक्ष्मी जशी
अंगाला कुंकुम गंध, धुपलेले केस
टाकला सर्वांगीं माझ्या आकुल निश्वास
दिसलें, सरकतांच अर्धवट वस्त्र
डाव्या पयोधरावर चंदनाचें चित्र
प्रतिमेसमान उभी झाली
नगर गुंजनशून्य स्तब्ध संध्याकाळीं

पाही प्रिया मला
हळूहळू दिवा खालीं दारांत ठेवला ......२
येऊन समोर माझ्या हात ठेवी हातीं
मुक्यानें पुसले फक्त सकरुण नेत्रीं
ठीक आहे ना साजणा? मुख बघूनहि
बोलायला गेलो पण बोलवलें नाहीं!
ती भाषा मी विसरलों, नावें दोघांनाहि
किती आठवून पण आठवलीं नाहीं
अनेक विचार आले दोघांना बघून
झरझर ओघळले अश्रू नेत्रांतून
दोघांनीं भाविले किती द्वार-तरुतळीं
कसें केव्हां कळलें न मुळीं
अलगद आले तिचे सुकोमल हात
उजव्या हातांत माझ्या येणाऱ्या नीडांत
सांजेच्या पाखरवाणी, तिचा मुखशशी
नत वृंत पद्मासम माझ्या हृदयाशीं
हळूहळूंच झुकला. व्याकूळ उदास
मुक्यानें मिळून गेले निश्वासीं निश्वास..
रजनीचा अंधःकार
उज्जयनी करी सारी लुप्त एकाकार
दीप दारांतला
केव्हांतरी सोसाट्याच्या वाऱ्यानें विझला
क्षिप्रानदी तिरीं
आरती थांबून गेली शिवाच्या मंदिरीं.

## निरूद्देश यात्रा

नेतेस आणखी किती दूर मला अगे सुंदरी ?
बोल कोण्या तटीं लागणार तुझी सोन्याची तरी,
जेव्हां मी पुसतों अगे विदेशिनी,
हासते फक्त तूं, मधुरहासिनी,
उमजेना आहे काय कोण जाणे तुझिया मनीं,
मुक्यानें दाविसी उभारून बोट
आकूल उठतो सागर अफाट
दूर पश्चिमेंत गगनकोनांत तपन बुडे
आहे काय तिथें चाललों कशाच्या शोधांत पुढें ?
सांग तरी मला, विचारतों तुला. अपरिचिता ...३
तिथें जिथें जळे सांजेच्या काठाशीं दिनाची चिता,
झळकतें जळ तरल अनल
पाझरत आहे आभाळाचें तळ
दिशांची जणूं कीं आसू ढाळणारीं नयनें ओलीं
तिथेंच आहे कां तुझें घरदार
उचंबळणाऱ्या सागराच्या पार
गगनचुंबित अस्तगिरीच्या चरणतळीं ?
फक्त हासते तूं मुख पाहून न बोलतां मुळीं
हू हू करी वायू, टाकतो सतत दीर्घ निश्वास,
अन्ध आवेगानें करतां गर्जन जलाचा श्वास
संशयमय हें घननील नीर
कुठेंहि पाहतां दिसेनाच तीर
असीम रोदन जग बुडवून झिंगते जसें
त्यावर सोन्याची वाहताहे तरी

पडताहेत अन् किरण सांजेरी
बसून त्यांत तूं नीरव हास्य कां करते असें
मला समजेना कशाला तुझे हे क्रीडन पिसें !
जेव्हां तूं प्रथम हांक दिली कोण होणार साथी..
एकदा पाहिले डोळ्याकडे तुझ्या नवप्रभातीं
दाविला समोर उभारून कर
पश्चिमेकडे तूं असीम सागर,
चंचल उजाळा आशेच्यासारखा कंपतो जळीं
पुसले तरींत उठून बसून
आहे काय तिथें नवीन जीवन,
आशेचें स्वप्न कां फळा येतें तिथें सुवर्णफळीं ?
फक्त हासली तूं मुख पाहून न बोलतां मुळीं..
त्यानंतर कधीं उठलीं वादळें अन् कधीं रवि...
अन् कधीं प्रक्षुब्ध सागर अन् कधीं प्रशांत छवी.
वेळ आहे जात शीडांत ये वात,
सोन्याची तरणी कुठें आहे जात,
पश्चिम बघतो जात आहे सूर्य हा अस्ताचळीं,
पुसतो तुला मी आतां एकवार..
तिथें आहे काय मृत्यु हळुवार,
किंवा आहे शांति, किंवा आहे सुप्ति तिमिरतळीं ?
नेत्र हासतील तुझे कांहींच न बोलता मुळीं...४
अंधारी रजनी, मिटवून पंख येईल आतां
सांजेच्या आकाशीं तेज सोनियाचें जाईल अस्ता
कानीं येतो फक्त जल-कलरव
देहीं उडे पडे वायूभरें तव केसांची रास

विकल हृदय विवश शरीर
पुकारून तुला सांगेन अधीर...
कुठें आहेस गे, जवळ येऊन करच स्पर्श,
नच बोलशील दिसणार नाहीं नीरव हास्य...

× ×

## बा. भ. बोरकर

### नववधू

हे वधु सुंदरि तूं मधु मंजिरि
घे फुलते चंपक अभिनंदन
पर्णिल पात्रीं फाल्गुन रात्रीं
घे स्वर्णिल सुममाला बंधन
गंधित आणिलि मधुमासांजलि
पलाश-कुंकुम ज्योत्स्ना चंदन
पारुल कंपन शिरीष नर्तन
मंजु वल्लिका व्यंकट कंकण
वेणुवनांतिल हर्ष विशृंखल
नव दल मृदु मलयानिल चुंबन
नयन पल्लवी हृदयवल्लभे
गगन नील भरि गे स्वप्नांजन.

×

### फाल्गुन

वनिं वनिं फाल्गुन लागे रे
फुलाफळावर दळादळावर
कोनीं विजनीं जागे रे

रंग रंग रंजित आकाश
भुवनत्रय गानांत उदास
जणुं चल चंचल नवपल्लवदल
साथ मनीं मम मागे रे
पहा पहा धरणीचा रंग
गगनाचा करिते तपभंग
हसित विद्ध मन मौन न साहुन
कांपतसे अनुरागे रे
पवन बने वनमय रे
नच त्या सुम परिचय रे
पुसित परोपरि, कुंजद्वारीं
फिरे जनांच्या मागे रे.

✻ ✻

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. १२८७७.
संदर्भ शाखा

## चिमणा वीर

( कै. गुरुवर्य रवींद्रनाथांच्या वीरपुरुष या कवितेचा अनुवाद. )

हें भयाण जंगल, दाट, देशही परका
अन् आपण दोघे तिथें प्रवासी बरं का
चालली लाल घोड्यावर अमुची स्वारी
ये पालखींतुनी तूं माझ्या माघारी
भयकातर वेळा पसरे संध्या छाया
रवि मावळताही विरल्या त्या पडछाया
तो पुढे जलाशय सामसूम वैराण
अंधार भोवतीं भासे सर्व भयाण
भ्यालीस मनीं तूं आई ! पडसि विचारीं
चिंतितें मन तुझें जें न चिंतितो वैरी
हा मुलूख नवखा अनोळखी ही वाट
लोटीत संकटीं काळोखी घनदाट
मी धीर दिला गे आणुनिया अवसाना
भिउ नकोस आई, मी जवळी असतांना
कांटेरी झुडुपें, झाडी कैचण पानें
वाढलें उंच हें गवत सखल मैदानें
खळग्यांनीं खचली मधेंच पाउलवाट
ठेंचाळत जातां एकाकीं केकाट

कुरणांत दिसेना कुठे कळप गाईंचा
आवाज किर्र हो निर्जन वनराईचा
नभ धूसर झालें अंधुक अंधारानीं
कांहींच कळेना आलों कुठल्या स्थानीं
तूं लगेच जवळीं बोलविलें गे मजसी
आवाज दाबुनी हळूच कानीं पुसशी
ती भीती नयनीं बोल कांपऱ्या ओठीं
तो उजेड कसला पहा तलावाकाठी
इतक्यांत आरडा करीत चोर लुटारू
अंगावर येती अम्हां पाहती घेरूं
मेण्यांत भीतिने तुझा उडे थरकावा
श्रीरामप्रभूचा करिसि सारखा धावा
घाबरून लपले झुडुपामागे पाही
पालखी टाकुनी तळीं, पळाले भोई
ओरडून वदलों धीर तुला मी द्याया
मी समर्थ आई तुजसी सांभाळाया ..
हातांत दांडकीं केसांची गुंताळी
ते क्रूर लठंगे येउं लागले जवळी
धमकावित त्यांना दिली एक ललकार
परजीत आपुली उंच धरुनि तलवार
" हां खबरदार पाऊल पुढें टाकाल,
चोरांनो इकडे येतां फुकट मराल, "
कल्लोळ करित ते अंगावरती येती
तूं वदलिस मजला हात धरोनी हातीं
" वाटेस तयांच्या जाउं नको रे राजा "

" तूं पहा तर खरी आज पराक्रम माझा "
अन् दिली आपुल्या घोड्याला मी टांच
तलवार उगारुनि धाऊनि गेलों तोंच–
क्षण तलवारीला भिडल्या त्या तलवारी
रण तुंबळ झालें खणखणाट अंधारीं
मेण्यांतुन वाकून तूं जर बघतिस आई
काळीज थरकतें बघतां मम चतुराई
किती मरून पडले चोर दरवडेखोर
पळपुटे पळाले जीव घेउनी पार
तूं एकलीच हा असशिल करित विचार
की तुझा लाडका असेल झाला ठार
रक्ताने भरलें अंग, तीक्ष्ण तलवार
येतांच परतुनी द्याया तुजला धीर
उतरलीस खाली अपुल्या मेण्यामधुनी
चुंबिलेस मजला घट्ट मिठी मारोनी
बोललीस अपुली अपुल्याशीच सचिंता
' नसता जर माझा बाळ, कोण सोडविता '
किति घडती जगतीं रोज अशा या घटना
मग कां ग मजसी ऐसी संधि मिळेना
होईल रम्य ही गोष्ट पुस्तकामधली
जन म्हणतिल सारे अशक्य गमते सगळी
तो होता म्हणुनी आईसोबत धीर
नाजूक पोर हें तरिही " चिमणा वीर "...

✕

## श्यामा

एकदिनीं हळुच कुणी येउनि मज गौरविलें
बाहुलिच्या लग्नाचें आमंत्रण-पत्र दिलें
जमले सारे वऱ्हाड मांडवांत करवल्या
हसति मधुर किलबिलती ललित खेळ बाहुल्या
मुलखाचा मुखचुकव्या मी चुकार लाजरा
सलत उरीं संकोचे बसे धरून कोपरा
निघुन जाय सांज ही खुळ्याच शंखकीटका
हुके अमोल प्रेमसंधि संधिकाल ही फुका
केलेले ते पदार्थ आठवते ग सगळे
लुटुपुटुच्या लग्नाचे लाडू खायास मिळे
येतां जातां दिसती दोन गौर पावलें
त्यावरीं किनार काळी झुळझुळता घेर खुले
मणिबंधीं बंधित ती करकंकण-किरण-कांति
रुणझुण मन मोहवितें भंग करित चित्तशांति
आर्जव, अनुरोध हसित, उपरोधी मधुवाणी
झाली जरि मध्यरात्र ध्वनिगुंजित हो कानीं.

✢

## चारुमति

कितिदां तरि चारुमती भुलविलेंस सहज मला
आठवते का रसिके चटुल भाग चतुर कला

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम 38205 वि:
1585 नों: दि:

शिंजित कर-कंकण-रव
मधुर मधुर करि आर्जव
उघडाया बंद दार मजसि छंद लागला...
तरलित वायूवरती
ललिते संकेत किती
वातायनिं विहरत ये नेत्र विभ्रमांतला..
नवमंजिरि परिवेषीं
आम्रतरूवर येशी
मेघ-मंडळांत दिसे सुभग रुचिर रूप कला...

✖

शिवपर्व

**महाराजाधिराज शिवाजी**

१. दूर कुठे किति शतकामागे, कळे न आजहि मजसी
निबिड काननीं, कडे-पठारीं कवण्या अश्रुत दिवशीं
एकसंघ भावना विजेपरि स्फुरली हृदयीं तुझिया
कुंठित होई मती कल्पिता छत्रपती शिवराया
एकछत्र ही विचारधारा घन अंधारांतुनी
राज्य हिंदवी, अभंग भारत खंड खंड सांधुनी

२. उठला नव्हता झोपेमधुनी तेव्हां बंगाल
कुशी चाळवित घोरत पडला पांघरूनी शाल
घरकुलांत गुरफटला पुरता, नव्हती दरकार
तुझ्या स्वागता मुळि न धावला उघडाया दार

सामसूम तें परिसर सारें, ऐकुं न आला कानीं
स्वातंत्र्याचा शंखनाद जो भरला कानोकानीं
वाजवीत पैंजण सांज ये पदन्यास मनहारी
चंद्रकलेचा शालु नेसली पदर उडे जरतारी
पसरी माया संध्याराणी नव चंदेरी जाळें
सुखें झोपवी पदराखाली अजाण चिमणी बाळें

३. काय जहालें एकाएकीं–कभिन्न तम काळा
चिरीत आलें तेज कोठलें करीत चिरफाळा
मावळांतल्या माळावरुनी उफाळल्या ज्वाळा
सह्यगिरीच्या माथ्यावरुनी भिडल्या आभाळा
लखलखत्या बिजलीनें लिहिला मुक्तीचा लेख
इंद्रधनूच्या रेषेवरती जळता आलेख
दिल्लीचें साम्राज्य मोंगली मुकुटावरला तुरा
पिकल्या पानापरी हादरे संधिकाल भातरा
घेइ न कानीं, महाराष्ट्राचा स्वतंत्र विद्युत्घोष
नव्हता जागा वंग, तुझा तो ऐकाया आदेश

४. भयाण रातीं - दरबाराची मोंगल महिराप
देहलींतला विझूं लागला एक एक दीप
गिधाड, घुबडें, धुत्काराने प्रेतावरती तुटती
मोठेपण मातींत मिळालें मिणमिण जळते पणती
सत्तेचा अभिमान, महत्ता थाटमाट हे सारे
चिमूट उरली राख शेवटीं, तीहि उडविति वारे.

५. सामसूम सीमेवर एका दूर अघाडीवरति
बंगाली हाटांत कुणाचीं चोरपावलें सरती
हा सौदा सौदागर आला सागर-साम्राज्याचा

हेतुपुरस्सर हेर पातला नूतन अधिराज्याचा
गुप्तपणाने करितों स्वागत वंगदेश अविचारी
चोरपावलें पावन करिती जनगंगेच्या लहरी
झुके तराजू एके बाजू, घडून ये नवलाई
रात संपता, तागडिचा तो राजदंड होई
जाउं न देई तोल, झुकोनी झाला बलशाली
मान आपुली झुकवायाते सजले बंगाली.

६. स्वप्नस्वरूपा, हे शिवभूपा, वससि कुठें त्यां काली ?
गुहागुहांतुनि नांव गुंजले तुझें पराक्रमशाली
वीर भूषणा, भगवा ध्वज तो मळवी मेली माती
तुझा दिव्य संदेश स्मशानीं आज कावळे गाती
तुझिया इतिहासाचा होई आजवरी उपहास
अभिमानाने परवशतेचा गळा बांधिला फास
तुझ्या कृतीचें हंसें जाहलें, हसे शेंबडें पोर
अनादराने तुला ठरविलें चोर दरवडेखोर.

७. चुकलेल्या इतिहासा, ऐसे कशास वदसी खोटें
नोंद चुकीची तुझी, मोडिसी उगाच अपुलीं बोटें
दाबुनिया ठेविलेंस जरि तूं, सत्य कधी ना मरतें
अमर अजर तें आजवरीही, मरणानंतर उरतें
विस्मृतिच्या कबरचांत कोंडलें, अंतरांत धगधगतें
उफाळुनी येईल फोडुनी - सत्य सदा तें जगतें
अविनाशी ते अनंत, नांदे अखिलांतरांत जगती
कृतिमंगल आदेश अमर तो झाकुं शकेना धरती
शिव सुंदर ती विचारधारा, योगिराज शिवराया
ध्रुवापरी ती अढळ जाहली प्रभुपदिं पावन काया.

८. चोरिल सत्याचा कण कैसां गिळेल पळता काळ
करि परमेश्वर शुभं कृतीचा स्वतःच सांभाळ
स्वप्नींहि कल्पिला न कोणी असामान्य गुणशीला
स्वातंत्र्याची तीव्र तितिक्षा, तुमची विक्रमलीला
दीर्घ तपश्चर्या ती निश्चल, मातृभूमिची सेवा
प्राणांची आहुती टाकली रणयज्ञीं भूदेवा
दिलें भारता चिरंतनाचें अमोल वरदान
जपून ठेविल अभिमानाने भारत-संतान

९. वैरागी राजया, कंदरी झुळझुंळली शिवगंगा
किती काळ ती कृश प्रवाही लपवी चंचल अंगा
पळांत झाला प्रपात धावे प्रचंड आवेगांनी
कडया-कडयांतुनि उडया घेत ये जलौघ शत धारांनी
तशी विजेची तेजशलाका घुसली होउनि झोत
उजळायाला दिगंत सारे निजले अंधारांत
शिवरायाची विजय पताका फडके आज नभांत,
कशी राहिली ती लपलेली काळाच्या उदरांत.

१०. पूर्व रवि कवी आज जाहले आश्चर्याने दंग
विजयाचें रणशिंग फुंकिता निनादला हा वंग
तीन शतांचे तेजोबल तें चिरितें घन तिमिरातें
उदयगिरीवर नव संजीवन सूर्य येइ उदयातें

११. असे अमर तें, सत्य न मरते काळाच्या आघातें
शतशतकांच्या तमिस्रांतुनी तेजाने प्रस्फुरतें
विस्मृतींत नच विरतें, नच तें असुयेने ओसरतें
विद्वेषाने विझते नच तें उपेक्षंत हादरतें

भीतीला ना बुजतें नच तें निंदेला घाबरतें
काळावर नाचतें युगांचा अथांग सागर तरतें
तेंच सत्य जे तुम्ही समजला पुरतें मेलें गेले
सत्य तेंच सन्मान्य पाहुणे भारत-द्वारीं आले.

१२. तोच मंत्र, उद्देश, भव्य ती स्वप्नरंजिता दृष्टी
साकाराया भविष्यांतली दिव्य कल्पना सृष्टी
दृश्य कोणतें बघति कळेना टक लाउनिया डोळे
क्षणाक्षणाचें विणलें मेदुनि गत काळांचें जाळें
अशरीरी हे राजमहर्षी, समर्थ शुभ निर्धारा
आज तोच उत्साह घेतसे ज्योतिर्मय अवतारा

१३ नसे शस्त्र-संभार राजया, नसे आज ती सेना
हर हर हर महादेव गर्जिते निनादवी भू - गगना
स्वर्गांतुनि उतरलें खालती शिवरायाचें नाम
वंग भूमिचे सुपुत्र झेलति हृदयासनिं अभिराम

१४. शतकत्रय लोटलें कुणाच्या कधी न आलें ध्यानीं
स्वप्नांतहि ना चुकून दिसले, नवल असे अवधानीं
संगराविना संगम घडवी, बनवी हृदय विशाल
तुझें नांव तारितें जोडितें महाराष्ट्र बंगाल
तुझ्या तपाचें तेज अगोचर अवचित प्रगटे आज
नव संजीवन पहाट फुलली, क्षितिजीं ये शिवराज

१५. दूर मराठी मावळांतुनीं हांक दिली आम्हांतें
धर्मराजया, ओळखिलें ना आम्ही आपुलें नातें
उठला ना पडसाद अंतरीं, लाज न वाटे खंत
उरांत धडकी जयनादाने दुमदुमताच दिगंत
दिवशीं अेका वंगाकाशीं तळपे अनिवार

बिजलीपरि ती वरदहस्तिनी भवानि तरवार
बसला धसका, धाक भयंकर खेळ क्रूरतेचा
ओळखला नच अर्थ समर्था भद्र रुद्रतेचा
१६. कृतांत सिंहासनीं विराजे मूर्तिमंत अमरत्व
उन्नत भालावरी झळाळे किरीट द्युति कर्तृत्व
ओळखलें प्रभु ओळखलें रे आज तुला भूपाला
वंग भूमिच्या करभारांची कंठीं मंगल माला
पंच प्राणांची पंचारति, तुजला ओवाळाया
महाप्रतापी शिवराया हो प्रसन्न वंग जना या.
१७. ऐकला न तव वीरभैरवा रव तो त्या काळीं
मंत्रघोष भारती मनातें या संकट काळीं
एकत्रित करि संघ–भावना सर्व हिंदवी देश
कोटि कोटि कंठांतूनि उमटे तोच दिव्य आदेश
भगवा ध्वज तो, व्याघ्रांबर तें संन्याशाची छाटी
एक राष्ट्र करि राज्य हिंदवी हे भारत वंद्य मराठी
देइ अम्हां चैतन्य समर्था तुझा दिव्य आदेश
धर्मराज्य हें करावयाते अखंड भारत देश.
१८. वग सुतांनो मराठ्यांचिया संगें बांधा कमरा
शिवभूपाचा एक सुराने जयजयकार करा
एकरूप व्हा महाराष्ट्रासह जागृत बंगाली
जयोत्सु जय जय ये शिव उदया आज अंशुमाली
शिवरायाच्या महोत्सवाच्या पर्वणींत पाही
पूर्व पश्चिमा, उत्तर दक्षिण मिळति दिशा दाही
एकरूप एकत्रच भोगुं गौरव सर्वांही
एक नाम जय घोष घुमूंदे पावन शिवशाही...

✗ ✗

## कवीन्द्रा, तें गाणें दे

१ तें गाणें दे, कवींद्रा, तें गाणें दे
ज्याच्या लयींत ज्याच्या गतींत
गूढ धूसर धुक्यांत फिरणाऱ्या
पृथ्वीच्या सोनेरी नारंगी कडा
असीमाला प्रदक्षिणा घालीत असतात-
तें गाणें दे, कवीन्द्रा, तें गाणें दे ..

२ अजूनहि ही धरणी,
त्या गाण्याची वाट पाहात आहे
वाऱ्यांतून फुलांतून
आकाशाच्या रंगांतून
सागराच्या तरंगांतून
तें गाणें शोधीत चाललेल्यांना
आनंदाच्या मुशाफिरा,
तूं तें गाणें दिलेंस
अनुक्ताचा तो शब्द
त्याला तुझ्या गीतांत सांपडला
तुझ्या ध्रुवपदांत आढळला
शाश्वताचा तो सूर
शून्यापलीकडील निःशून्याचा अनाहत नाद

त्या अनादाला नाद दे,
कवीन्द्रा, तें गाणें दे..

३ तुझे शब्द, चिरयौवना ऊर्वशीच्या
अंगकांतींत न्हाऊन आले
उपेक्षित ऊर्मिलेच्या डोळ्यांतील
दुःखाचें काजळ लेऊन आले
वंचित व्यथित देवयानीचा उःशाप
तुझ्या वाणींत उःशाप झाला
संजीवनीचा मंत्र बनला, दुखऱ्या खुपऱ्या यौवनाला
विसर्जनाचें गाणें दे
वेदनेचा वेद दे,
कवीन्द्रा, तें गाणें दे..

४ आजहि तेच वारे वाहात आहेत
तेच तारे जागत आहेत
तींच फुलें तींच उन्हें
हांसत आहेत मावळत आहेत
नदी पुढेच धांवत आहे .....२...
पाण्यावर नाव डोलत आहे
प्रश्नाकार
नावाडी पण कुठे आहे ?
ह्या नावेला वल्हवणं दे
नावाड्याला गीत दे
मुक्त नदीला कांठ दे
कांठालाहि गाणें दे

कवीन्द्रा, तें गाणें दे..

५ मानवतेच्या सागरतीरावर
तशीच यात्रा जमली आहे
वाळूंत वेणु वाजत आहे
मरणाच्या दारीं
सोन्याचा पिंपळ डोलत आहे
परंतु—स्वरांना बहिरे
प्रकाशाला आंधळे बनून
आम्ही भटकत आहों
अणुगोलाच्या धुराने
कोंदलेल्या क्षितिजांत
अश्वत्थाम्यासारखें–
मस्तकांतला मणि हारवून
शापित चिरजीवन घेऊन
सूडाने हिंसेने कुष्ठी बनून
दिवसरात्रीच्या वाटेवर

६ संध्येच्या पलीकडे
तूं अजूनहि गात उभा आहेस
तुझ्या शब्दांत, आनंदाचीं उन्हें आहेत
फुलांचे रंग आहेत गंध आहेत
ताजे सतेज
या शतकाच्या दंवांत भिजून
अश्रु पिऊन कोंडलेल्या या दिशांना
व्यथित घनांना,

उषेंतल्या त्या आटळलेल्या, स्वप्नफुलांना
फिरून उन्हाचा स्पर्श दे,
कवीन्द्रा, तें गाणें दे...

✻ ✻

## पद्मावती गोळे

### याचिलें न मी तुजला कांही

याचिलें न मी तुज़ला कांही,
नांवहि माझें नच कथिलें
घेतलास तूं निरोप तेव्हा
मूक उभी मीं राहियलें
भरुनि शिगोशिग अपुलाले घट
मैत्रिणि गेल्या घरोघरीं
एकलीच मीं उभी साउलित
त्या बावडिच्या शेजारीं
हांक घालिती सख्या मला अन्
सकाळ टळली चल, म्हणती
पाय घुटमळे अंधुकतेमधि
मीच हरवलें मज पुरती
मीं न तुझी चाहूल ऐकिली
कळे न केव्हा तूं येसी
पाहिलेंस मज आणि ना कळे
उदासीन कां आलासी ?
" तृषित प्रवासी एक असें मी "
पुटपुटसी तूं श्रांत स्वरें
दचकुनि उठलें, आणि घातलें

अंजळींत तव जळ स्वकरें
सळसळलीं तरुपणें कोकिळ
कूजन दूर कुठे चाले
वळणावरुनी बाभुळ ढाळी
शिरावरीं वैभव पिवळें
पुन्हा कधीशी भेट जहाली
नांव मला तूं विचारलें
अवाक् झालें मी लज्जेने
काळवंडलें, गोंधळलें
काय तुझ्यास्तव केलें मी
तूं ठेवावें नाम स्मरणीं
मी जरि जपतें नाम तुझें नित
घेउनिया हातीं स्मरणी
हे तृषिता, मीं दिलें तुला जळ
हेंच एक मज आठवतें
आणिक अनुपम मधुरतेंत त्या
जीवन सारें गुरफटतें
प्रभात टळते, मूक होति खग,
निंब सळसळे शिरावरीं
तुझिया स्मरणीं हरवुनि बसतें
एकलीच मी वनांतरीं.

✲

## राहिलें तसेंच गीत

गायचें असूनही राहिलें तसेंच गीत
जुळविण्यांत तार तार
घालविले दिन अपार
आणि या घडीसही राहिलें तसेंच गीत...

येइ न का योग्य समय
शब्दांची न जुळे लय
गाण्याची आस मात्र हृदयीं या सलत नित्य...

अजुनि मूक सुमन सुमन
उसासतो मात्र पवन
द्यायास्तव त्यास साथ गंध उरे पाकळींत...

देखिलें न वदन-कमल
ऐकिलाहि नाहि बोल
पदरव परि श्रवणिं पडे, जधि तो येथून जात...

अंथरिता मृदु आसन
त्यांतच हा सरला दिन
बोलवुं कशि त्यास आंत, लाविली न सांजवात...

भेट न परि होइ अजुनि
सूर सूर दाटत मनिं
गायचें असूनही राहिलें तसेंच गीत...

✖

## सरला दिन

सरला दिन साजणी
उतरती धरतीवरती छाया
मला जायचें घाटावरती
घागर भरुनी घ्याया
जललहरींच्या उदास गानें
संध्या व्याकुळ झाली
तीच काय, मला बोलवी
ये सखि कातरवेळीं
निर्मनुष्य या घाटावरली
अता थांबली ये जा
मला जायचें घाटावरती
भरावया घट माझा
जळिं लहरीवर लहरी उठती
स्वैर वाहती पवन
हुरहुरतें मन न कळे बाई
भेटायाचें कोण ?
हेंहि कळे ना घरीं परत मी
येइन किंवा नाही
कळे न नौकेमधे कोण तो
बीन वाजवित राही

सरला दिन साजणी उतरती
धरतीवरती छाया
मला जायचें घाटावरती
घागर भरुनी घ्याया.

❈

## सौ. सरोजिनी कमतनूरकर

### हिंगू टिंगू छदू

### अर्थात्

### स्वप्न - मंगल

स्वप्न-मंगलाची कथा अमृत समान
गौडानंद कवि सांगे ऐके पुण्यवान..
स्वप्न पडलं एक हबूचंद्र राजाला
अर्थबोध होईना गबूचंद्र मंत्र्याला.
उशागतीं बसलेलीं होतीं तीन माकडं,
उवा काढायचं काम त्यांचं चाललं होतं फाकडं..
थपडत होतीं बेलाशक इकडं तिकडं केलं तर,
उठत होते ओचकारे साऱ्या तोंडावर..
गडप झालीं माकडं अन् वैद्य एक आला,
उडालीं रे पाखरं, म्हणून रडूं लागला..
आधी घेतला राजाला उचलून खांद्यावर,
लगेच त्याला ठेविला उंच खांबावर.
खांबाखालीं होती एक जख्खड लुकडी म्हातारी
हांसत खाजवी तळव्यांना गुदगुल्यांनी बेजारी..
राजा म्हणे, पीडा झाली, करूं तरी काय,
आखडूं जातां वरती, माझे ओळंबती पाय..

खगापरी राजा करी भारी झटापट,
कानीं बोले वैद् तेंव्हां, हिंग् टिंग् छट्..
स्वप्न मंगलाची कथा अमृत समान
गौडानंद कवि सांगे ऐके पुण्यवान्..१..

हबूपूर राज्यामध्ये गेले दिन सात,
झोंप नाही कोणाला शीत ना पोटांत,
मान लवे खाली अन् हात मुकुट गालीं,
ऐशा जाली प्रजा सारी चिंतातुर झाली..
खेळ पारखे पोरांना, पंडितांना पाठ,
मुकाट झाल्या महिला साऱ्या घडलें सर्व अचाट,
रांगा रांगा लोकांच्या मुखीं बोल नाही,
बोजा वाढे चिंतेचा मान खाली होई..

भूमिमध्यें दडल्या तत्त्वा झटति शोधाया,
किंवा होल्या बसल्या पंक्ति यथेच्छ जेवाया,
अधून मधून श्वास सोडिती उत्कट
फुत्कारिती मधे कोणी हिंग् टिंग् छट्...
स्वप्न मंगलाची कथा अमृत समान
गौडानंद कवि सागे ऐके पुण्यवान्...२..

दिशा दिशांनी जमलें पंडितांचें दल
अयोध्या, कनोज, कांची, मगध, कोशल,
आले उज्जयिनीहून बुध अवतंसं,
कालीदास कवीच्या भाचऱ्याचा वंश....
मोठमोठ्या पोथ्यांचें उलटती पान,
जोर-जोरें हेलकावे शेंडीसह मान,
बड्या बड्या माथ्यावर पिकलेलं शेत,
वाऱ्यानें हले जणूं शिर–समवेत.

कोणी पाहे श्रुति, कोणी स्मृति वा पुराण,
कोणी पाहे व्याकरण, कोणी अभिधान,
धागा दोरा, गावेना शोध झाला खूप
वाढे फुका अनुस्वार-विसर्गांचा स्तूप.
गुपचुप जाहले, त्या बिकट संकट
उधान ते मधुनी ' हिंग् टिंग् छट् '

स्वप्न मंगलाची कथा अमृत समान,
गौडानंद कवि सांगे, ऐके पुण्यवान्... ३..

निराशेने बोलले हबूचंद्र राज,
" म्लेंच्छ देशीं आहे म्हणे पंडित समाज,
एकतरी पाचारुनी आणावा त्यांतून,
पकडीमध्ये असे त्याच्या असावा खिळून ! "

पिंगे केस, निळे डोळे, कपिश* कपोल,
पंडिताच्या स्वागतासी घडाडती ढोल,
अंगीं काळी,जाडजूड काट्छाट् कृति,
ग्रीष्मकाळीं उष्मा वाढे भारी उग्रमूर्ति.

प्रस्तावाविना तो घड्याळांत पाही,
" सतरा मिनिटें " म्हणे " जादा वेळ नाही,
सांगायचें कांहीं, तर बोला झट्पट्, "
सभा सारी बोले चट्, " हिंग् टिंग्, छट्..

स्वप्न मंगलाची कथा अमृत समान,
गौडानंद कवि सांगे, ऐके पुण्यवान...४..

* तांबूस

ऐकुनिया स्वप्नकथा लालीलाल झाला,
नयनांत धगागल्या अग्नीच्या ज्वाला,
जोराने आदळी मूठ डाव्या हातावरी,
“ पाचारूनी उपहास ? ” पंडित विचारी.

हास्यमुखी फरासी, झोंक खान्दान्,
छातीवरी हात आणि लवलेली मान
बोले, स्वप्न राजासी साजणारें छान् !
अभाग्याला लाभणारें नव्हेचि हें दान..

राजशिरीं बसलेले आहेच जरी,
स्वप्नाची त्या खाराखोशीं करितो तरी
अर्थागारीं अर्थ भारी, अर्थ, हवा तर,
राज स्वप्नीं अर्थ नाही, शोधूं गेलें तर.
नसे जरी अर्थ, तरी वदूं अकपट
कानीं लागे गोड गोड ‘ हिंग् टिंग् छट्..

स्वप्न मंगलाची कथा अमृत समान,
गौडानंद कवि सांगे ऐके पुण्यवान्..५

सारे सभ्य ओरडले, “ अरे धिक् धिक्,
कोठला हा गंडमूर्ख* पाषंड,° नास्तिक
म्हणे स्वप्न ! स्वप्न असे डोक्याचा विकार !
ऐशा निर्णयाचा कैसा करावा स्वीकार !
धर्मप्राण ख्यात असूं, श्रेष्ठ आमची जात,
आम्हां देखत डाकू करितो स्वप्नासी आघात ! ! ”
हबूचंद्र राजा बोले डोळे वटारोनी,

* महामूर्ख, ° पाखंड.

" गबूचंद्र, शिक्षा यांना अपराधांच्या तोलांनी
खडड्यामध्ये गाडा आधी खाली वर कांटे,
कुतरड्यांना टाका यांच्या तुकड्यांचे वांटे. "
दहा सात मिनिटें नव्हतीं संपलीं
म्लेंच्छ पंडितांची जोडी दिसेनाशी झाली.
परिणामीं सभा सारी आनंदें डोले
शांति-धर्म दोघांचें पुन: राज्य आलें
क्षणामध्ये पंडितांच्या मुद्रा त्या सुकट
घोकताती पुन्हा पुन्हा ' हिंग् टिंग् छट्.. ' !
स्वप्न मंगलाची कथा अमृत- समान,
गौडानंद कवि सांगे ऐके पुण्यवान् . . ६. .

त्याच वेळीं सभेमाजीं गौडी* एक आला
यवनांच्या गुरूंनाहि भारी असता झाला,
लाज नाही, साज नाही, डोकें बोडकें,
सोगा कांस फिटणारी, खोवितो टोकें,
काया काडी तोकडी ती प्राणहीन जसा
शब्द फुटे तेव्हा वाटे आहे जितासा,
क्षेम नाही, कुशल नाही, नाही नमस्कार,
कुलनांव विचारतां भडके अंगार,
ताठयाने तो पुसे चाले कशाचा विचार ?
सांगा सांगा, गोष्टी सांगू तुम्हांलागी चार
व्याख्येचीहि करूं शकूं उलटापालट,
एकमुखी घोष उठे " हिंग् , टिंग् छट्. ."

* बंगाली

स्वप्न मंगलाची कथा अमृत समान,
गौडानंद कवि सांगे ऐके पुण्यवान्. .७. .

गंभीरला गौडी साधु स्वप्न भारुडें
त्याच्यासाठी प्रहराकाठीं भाष्य बडबडे,
सरळ आहे अर्थ त्याचा, निर्मळ ही फार,
पुरातन भावाचा हा नवा आविष्कार.

त्र्यंबकाचे त्रिनयन त्रिकाळ त्रिगुण,
शक्तिभेदी व्यक्तिभेद द्विगुण विगुण
विवर्तन आवर्तन संवर्तन आदि
जीवशक्ति शिवशक्ति करी विसंवादी

आकर्षण विकर्षण पुरुष प्रकृति
आणव चौंबकबलें आकृति विकृति
कुशाग्रीं प्रवाहमान् जीवात्म विद्युत्,
धारणा परमाशक्ति तेथेंच उद्भूत
त्रयी शक्ति त्रिस्वरूपीं संसारीं प्रकट
संक्षेपाने म्हणायचें, ' हिंग्, टिंग् छट्-'

स्वप्न मंगलाची कथा अमृत समान,
गौडानंद कवि सांगे, ऐके पुण्यवान्. ८ . .

" वाहवा, वाहवा, " तेव्हा करी सारी सभा,
किती सोपा अर्थ अहा, काय विद्येची प्रभा . .
अवघड फक्कड, गढूळ होतें, झालें गंगानीर,
अर्थाचें, नभ निरभ्र झालें, सुटला ज्ञान समीर,
हायसें होऊन मनीं राजा उभा राहिला
किरीट काढुन डोईचा हातामधे घेतला

हाडकुळा तो बंगाली, त्याच्या माथीं स्थापिला,
किरिटाच्या ओझ्याने मानकांटा मोडला,
फारा दिनीं चिंतेचें अघ* दूर झालें
हबूराज्य आनंदे हलूं डोलूं लागलें,
वृद्धामुखीं पंचम्°, बालाननें रंगलीं
बायकांचीं तोंडे पुन्हा एकदम चालूं जाहलीं
देशव्यापी माथेशूळ झाडून गेला झट्,
कळून चुकलें, म्हणजे काय, 'हिंग् टिंग् छट्!'
स्वप्न मांगल्याची कथा अमृत समान
गौडानंद कवि सांगे, ऐके पुण्यवान्..९..

स्वप्न मंगलाची ही कथा
ऐकणाऱ्याची करील मुक्तता
सर्वभ्रमापासोनी सर्वथा
अन्यथा होणें नसेचि..

विश्वीं विश्वविचाराची चिंता
फसवूं न शके श्रवण करता
'सत्य' 'सत्य' तें सर्व मिथ्या
होईल जाणता अवचित...
आहेचें होई नाही,
नाहीं मधेच आहे राही
ऐशी स्थिति प्रतीत होई
श्रोत्यापुढे धडधडून..
भासे लोकास सरळ नीट

---

* संकट °पान

त्यासी लावील आपुलें शेपूट
( लढवोनिया अर्थ विकट
आत्मप्रौढी मिरविण्या )
या हो भाई, द्या जांभई पडून रहा चीत्,
संसारीं या अनिश्चित एक मात्र निश्चित
जग आहे मिथ्या सर्वभर माया
स्वप्न एक खरेंखुरें बाकी सर्व वाया..
स्वप्न मंगलाची कथा अमृत समान
गौडानंद कवि सांगे ऐके पुण्यवान..१०..

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थ
अनुक्रम 38264 दि: 
क्रमांक 1545 नों दि 25-2-

✕

## जीवनीं केली पूजा

जीवनीं केली पूजा अपुरी राहिली,
जाणितों तरी ना ती विफल जहाली.
फूल ना फुललें तों पडलें गळून,
वाळूंत वाळलेलें नदीचें जीवन
जाणितों तरी ना तें विफल म्हणून.
जीवनीं जितुकें माघारीं राहिलें
जाणितों मनीं ना तें फुकाचि गेलें..
जाणीवेविण माझ्या स्पर्शाहि वांचून,
तुझिया वीणेवरी, राहील वाजून,
मानितों होईना तें विफल म्हणून..

✕ ✕

## संजीवनी मराठे

### विपत्तींत करि रक्षण माझें

विपत्तींत करि रक्षण माझें अशी पदांशीं नसे प्रार्थना,
मनिं, विपदेचें भय न रहावें, प्रभु, मजला इतुकें देशिल ना?
दुःखानलिं मी पोळत असतां नको धावुनी करूं सांत्वना
दुःखावर मज जय लाभावा, प्रभु, मजला इतुकें देशिल ना?
असलों जरि असहाय जनीं मी तरिहि पडावें बल अपुरें ना
निराश नयनीं अश्रु नसावे, प्रभु, मजला इतुकें देशिल ना?
प्रवाहांत परतीरा जाया शक्ति देइ रे करचरणांना
शिरिं माझा मी भार वहावा, प्रभु, मजला इतुकें देशिल ना?
सुखी असावें नतमस्तक मी, तुझी असावी ओळख नयनां
दुःखांतहि मी तुज वर्णावें, प्रभु, मजला इतुकें देशिल ना?
शिरीं असावी अविरत वर्षत तुझी उदार अथांग करुणा
निःसंशय मीं तुला भजावें, प्रभु, मजला इतुकें देशिल ना?

×

### दिनान्त

सांजेंत संपलें पांखरांचें गाणें
वाऱ्याचें धावणें थांबलें रे.

सत्वरीं निबिड काळोखाच्या तळीं,
माझी जीवकळी झांकून घे.
स्वप्न आवरणीं झांकिसी धरणी
धरिसी मिटुनी नेत्र तुझे
झांकिसी कमळें जशीं निशाकाळीं
तशी जीवकळी झांकून घे.
अर्ध्या वाटेवरी शिदोरी संपली
मुखीं उमटली चिंतारेषा
अवमानधूली अंगांगीं सांचली
उमेद जाहली क्षीण ज्याची
हळुवार हातीं करुणाघना रे
तयाची वेदना झांकून घे.
उषःपान दे या लाजऱ्या फुलाला
ओठीं लाव पेला अमृताचा..

✖

विरह

इथुन प्रियतमा तूं गेल्यावर
रवि माथ्यावर तळ्यांत आला
दुपार झाली अधिक प्रखरतर,
काम काम सरल्यावर सारें
सुनें सुनें घर संगतिला रे
गवाक्षामधे किती— काळ मी

बसूनि राहिलें लागुनि हुरहुर
इथुनि प्रियतमा तूं गेल्यावर.

चैत्रगंध घेऊन मातिचा
घरांत घुमला लोट हवेचा
तशांत होता घुमत मजेने
अवखळ जोडा कबूतरांचा
गुंजत होता भ्रमरहि नादीं
फुलाफुलांची वार्ता सुंदर
इथुनि प्रियतमा तूं गेल्यावर

तरुपर्णांतरिं होती सळसळ
गाव विसावत होता निश्चळ
दूर कुठे बन्सीरव व्याकुळ
त्या धाग्यांनी गुंफियलें मीं
गोड नांव तव आकाशावर !

घराघरांचीं दारें मिटलीं
जागत होतें मीच एकली,
भुरभुरणारे केश मोकळे
छायातटिं जळ मुळी न हाले
आभाळीं तापल्या परसले
क्लांत ढगांचे पुंज शुभ्रतर
इथुनि प्रियतमा तूं गेल्यावर.

उन्ह कडकलें – माळ तापले
फांदीवरती हितगुज अपुलें
कबूतरांचा जोडा बोले

गवाक्षामधे खिन्नखिन्न मी
संगतिला हें शून्य शयनघर.

✗ ✗

## तुझाच विरह साजे

प्रभो, प्रतिदिनिं भुवनिं भवनिं
तुझाच विरह साजे
विजन वनांत गिरिकंदरांत
आकाशीं सागरीं गाजे
रात्रीं अनिमिष तारकनेत्रांत
विलसे विमुग्धपणें
श्रावणझडींत पानांत फुलांत
तुझेंच विरह गाणें
वेदनाविकल गंभीर वेषांत
तोच घरींघरीं भेटे
प्रीतींत – अनंत वासनाकोशांत
तोच सुखासुखी दाटे.
करीत उदास तुझाच विरह
मौनांत पाझरूं लागे
ह्रदयीं भरून गानीं ओसंडून
असीम विश्वांत जागे
प्रभो प्रतिदिनिं भुवनिं भवनिं
तुझाच विरह साजे..



✗ ✗

## सौ. लीलावती भागवत

### मी हतभागी जन्माची

मी नयन क्षणार्धच मिटले
तितुक्यांत नाथ अवतरले
मम शय्येजवळीं बसले
निद्रिस्त पाहुनी मजला, माझें भाग्य पळुनिया गेलें.
ही निद्रा वैरिण साची
मी हतभागी जन्माची. .१. .

निःस्तब्ध निशेच्या वेळीं
नाथांची वीणा घुमली
चेतना मोहुनी गेली
त्या उन्मादक सुस्वरांत केवळ, स्वप्नें कां रंगलीं. .
ही हुरहुर अखंड जाची
मी हतभागी जन्माची. .२. .
या कितीक रात्री असल्या
निद्रेनें भारुन गेल्या
मृदु श्वासाने स्पर्शियल्या
निद्रेंतच विरलें सारें, रात्री दर्शनाविना सरल्या
पापणी जड कशी माझी
मी हतभागी जन्माची. .३. .

## जादूची पालखीं

जादूची पालखी माझी जाते आहे कुठें ?
जादूची नगरी मला बघायला नेते
इतके दिवस लबाड बसली होति लपून
मी मात्र आज हिला काढली बघा हुडकून
आता हिच्यांत बसून जाईन मी दूर
भिणार नाहीं कोणाला शिपाई मी शूर
वाटेंत लागेल जंगल असतिल सिंह वाघ
हरण ससे मारतात त्यांचा येतो राग
घेईन माझं धनुष्य, मारीन मी बाण
दुष्ट वाघसिंहांचा घेईन मी प्राण
सोडवीन हरणं ससे होतील माझे मित्र
त्यांच्याशीं खेळत खेळत घालवीन मी रात्र
मग जाईन शोधीत राक्षसाचा वाडा
सांगेन त्याला आधीं राजकन्येला सोडा
सुंदर गोरी राजकन्या होती घरीं मजेंत
सक्तीने पकडून टाकलिस तिला कैदेंत
दे तिला सोडून नाहीतर बघ माझा हिसका
लखलखीत तलवारीचा खाशील जोरांत फटका
राजकन्येला घेऊन जाईन तिथून आकाशांत
चांदण्यांचीं फुलं वेंचून माळीन तिच्या केसांत
तिथे खेळूं लपंडाव, गाड्या गाड्या भिंगोऱ्या
आमच्याभोंवती फेर धरतील स्वर्गांतल्या पऱ्या
मग बसूं पालखींत उतरून येऊं खालीं

राजकन्येला पोंचवीन वडिलांच्या घरीं
तिथून मला पालखी नेईल समुद्राच्या तळाशीं—
रंगीत मासे सुळुक, बुळुक करतील माझ्या पायाशीं
मत्स्यकन्या चालवतील इवलीशी नाव
मी पण मारीन वल्हं – वल्हव वल्हाव
समुद्रांतले शंख शिंपले खूप गोळा करीन
पालखींतून भरून आणुन आईला देईन
अशी आहे माझी ही जादूची पालखी
अगदीं माझ्या गट्टींतल्या मैत्रिणीसारखी.

✻

## जीवित धारा

हीच दिव्य ती जीवित धारा,
झरते रात्रंदिन विश्वांतुन
मिरमिरते मम नसांनसांतुन
तालबद्ध करि द्रुतलय नर्तन
खळखळ वाहे नित्य झरारा ..१..
धरतीच्या मृदु कणांकणांतुन
हिरव्या मुकुलित तृणांकुरांतुन
पर्णांतुन नव पुष्पदलांतुन
फुलवित झुलवित रम्य फुलोरा..२..
करितें रोमांचित मम जड तन
प्रमुदित करितें निराशयुत मन
हेंच अचेतन, हेंच सचेतन
घडवित नूतन साक्षात्कारा,
हीच दिव्य ती जीवित धारा...३

✻ ✻

## श्रीकृष्ण पोवळे

### इच्छिलें कांही न

तुझियापासून इच्छिलें कांही न राहिलें मौन अकाम
निःशब्द राहिलें निरोप घेतांना पुशितां मज तूं नाम
एकली होतें मी निम्बाच्या छायेंत एकांत नदीच्या तीरीं
कलश जलानें भरुन निघाल्या मैत्रिणी आपुल्या घरीं
जातांना म्हणाल्या अग ए वेडे दुपार झाली अवेळ
आळसामध्ये तूं बसून खेळसी कोणता प्रीतीचा खेळ ?
तुझिया पायाची ऐकिली नाहीं मी चाहूल देवा तूं येतां
विषण्ण लोचना लोचन भेटले तूं क्लांत सांगतां कथा
तृषार्त पाय मी ऐकुन उठलें भंगुन क्षणीं समाधी
शीतल जलाची ओतिली धार मी तुझिया अंजली माजीं
मर्मर कंपतीं तरुची पानें नि कोकील कोठून गाई
वळणावरती कदंब फुलून सुगंध दाटला बाई
लाजून जाहले लाल मी जेव्हां तूं पुशिलें मजला नाम
तुझिया मनांत रहावें असें रे केलें मीं कोणतें काम
तुझिया तृषेच्या शमनासाठी मी केवळ ओतिलें तोय
माझिया मनांत राहील रंगत स्मरण याचें अक्षय
नदीच्या तीराला दुपार वेळेला तसेच गातात पक्षी
तशींच कांपत निम्बाचीं पानें हीं, असे मी तुझ्या प्रतीक्षीं.

## जीवन जेधवा शुष्क हें होई

जीवन जेधवा शुष्क हें होई
करुणा धारेने यावें
सकल माधुरी लोपून जातां
गीत सुधारसें यावें

कर्म जेधवा प्रबलाकारें
गर्जून उठे, वेढून सारे
हृदय- प्रांतीं नीरव नाथा
शांत चरणांनी यावें.

स्वतःच जेधवा होतसे कृपण
कोण्या ठायीं पडे हीन दीन मन
द्वार उघडून उदार नाथा
राजसमारोहें यावें.

वासना जेधवा विपुल होई
अंध अज्ञानी भुलवी मोहीं
अरे पवित्र, अरे अनिद्र
रुद्र होउनी तूं यावें.

आज वादळ रातीं तुझ्याशीं मीलन
हे माझ्या सख्या तूं माझा प्राण

आकाश आक्रंदे हताश सम
नीज न येई नयनीं मम
दार हें खुलें ये प्रियतम
संतत पाहत वाट

बाहेर कांही दिसत मजला नाही
तुझा हा पथ कोठून कोठें रे जाई
सुदूर कोण नदीच्या तीरीं ?
गहन कोण वनाभीतरीं ?
गभीर कोण घनांधकारीं ?
उभा तूं राहसी तेथ..

✻ ✻

## शान्ता ज. शेळके

### अकारण

काशबनामध्ये शून्य नदीतीरीं
पाहुनिया तिला शून्य पथावरीं
पुशिलें मी " जासी कुठे तूं एकली
धरून पदराआड दीपकली ?
घरीं माझ्या नाही झाली सांजवात
बाले, तुझा दीप ठेवुनी जा येथ..
काळेभोर डोळे उचलून वरी
लावुनिया दृष्टि माझ्या मुखावरी
चढत्या सांजेंत बोलली ती मला,
" सांजवेळीं अशा आलें मी या स्थळां
वाहत्या धारेंत बुडवाया दीप
उभी राहिलें मी जळाच्या समीप."
बघत होतों मी बघे काशबन
दीप तो विझून गेला अकारण..
चढत्या सांजेंत वाढला तिमिर
तेंच काशबन तेंच नदीतीर
" तुझ्या घरीं बाळे दीप उजळती
सोपविशील हा दीप कोणा हातीं ?
घरीं माझ्या नाही झाली सांजवात

बाले, तुझा दीप ठेवुनी जा येथ. .
काळेभोर डोळे उचलून वरी
लावुनिया दृष्टि माझ्या मुखावरीं
क्षण विमनस्क स्तब्ध उभी राहे
क्षण खाली क्षण वरती ती पाहे
बोले मग "दीप माझिया करांत
जळेल तो निळ्या विशाल नभांत..
सहसा ती बोले कर उभारून
दीपक विझून जाय अकारण..
अवसेची रात्र दुसरा प्रहर
दाटला सभोंतीं गर्द अंधकार
वक्षापाशीं एक दीपक धरून
येतांना तिला मीं पाहिली दुरून
"वक्षापाशीं दीप अशा अवकाळीं
चाललीस कोठे, हांक काय आली ?
घरीं माझ्या नाही झाली सांजवात
बाले, तुझा दीप ठेवुनी जा येथ. "
काळोखांत जशी चमकावी वीज
काळेभोर डोळे निरखिती मज
वदली ती मला, " माझा हा दीपक
दीपांच्या मालेंत तेवेल क्षणैक, "
लक्ष दीपमाला उठे झळाळून,
दीपक तेवत राहे अकारण..

✕

गंमत

मुली ही गंमत पाहिलीस का ?

तूं मला चार गोड वस्तु दे म्हणजे मग मी तुझ्याबरोबर येईन हं. कोणत्या ग त्या चार वस्तू ?

बरफी गोड असते, जिलेबी गोड असते, फेणी गोड असते. पण माझ्या मुली, तूं आपल्या कोमल हाताने मला चापट मारतेस ना? ती त्याहूनहि गोड असते बरं का !

मुली, तूं मला चार शुभ्र वस्तू दे, म्हणजे मग मी तुझ्या बरोबर येईन हं.

कोणत्या त्या चार वस्तू माहीत आहे ?

सांगू ? ऐक हं.

खीर शुभ्र असते. लोणी शुभ्र असतें. बासुंदी शुभ्र असते. पण मुली, तुझें स्पष्ट अन् निष्कपट बोलणें या साऱ्यांहून शुभ्र असतें बरें का !

मुली, तूं मला चार कडू वस्तू दाखव, म्हणजे मग मी तुझ्याबरोबर येईन हं.

कोणत्या ग त्या चार वस्तू ?

सांगू ?

कारलें कडू असतें, कारिंटें कडू असतें, लिंबाचा पाला कडू असतो. पण तुझें तें रुसून माझ्याशीं अबोला धरणें—तें या साऱ्यांहून भारी कडू लागतें ग !

मुली, तूं मला चार कठिण वस्तू दाखवून दे बरं.

कोणत्या त्या चार वस्तू माहीत आहे ?

ऐक हं.

लोखंड कठिण असतें. वज्र कठिण असतें. जोड्याचा तळ कठिण असतो. पण माझ्या लाडक्या मुली तूं एकदां आपल्या सासरीं गेलीस ना? म्हणजे तुझें माहेरीं येणें हें त्या सर्वांहून कठिण होऊन बसणार आहे, बरें.

मुली, चार खोट्या वस्तू तूं मला आणून दे म्हणजे मी तुझ्याबरोबर येईन.

कोणत्या ग त्या चार वस्तू?

ऐक मुली.

जादूचा खेळ खोटा असतो. भुताचें हंसणें खोटें असतें. काचेचा हिरा खोटा असतो. पण त्याहून खोटें काय असतं सांगूं?

तुझें तें नाक वर करून सूं सूं करून खोटें खोटें रडणें-तें या साऱ्यांहून खोटें असतें.

※ ※

# मंगेश पाडगांवकर

## चौफुला

### १. मोठा माणूस

मी छोटा बाळ आहें म्हणून मी आता लहान आहें. मी माझ्या बाबांएवढा झालों म्हणजे मग मी मोठा होईन.

माझे मास्तर येतील आणि म्हणतील, ‘चल, उशीर झाला, आण तुझी पाटी-पुस्तकं.’

मी मास्तरांना म्हणेन, ‘मी माझ्या बाबांएवढा मोठा झालों आहें, हें तुम्हांला ठाऊक नाही वाटतं? आता माझा अभ्यास बंद करा.

आश्चर्यचकित होऊन माझे मास्तर म्हणतील, ‘आता हा मोठा माणूस झाला आहे. ह्याने अभ्यास केला नाहीं तरी चालेल.’

मी झकपक कपडे करीन आणि जत्रेच्या गर्दींत मिसळेन. माझे काका मग घाबरून धावत येतील आणि म्हणतील, ‘माझ्या बाळा, गर्दींत कुठतरी हरवशील बरं. मी तुला उचलून घेतों कसा.’

मी काकांना म्हणेन, ‘काका, मी आता बाबांएवढा मोठा झालों हें तुम्हांला ठाऊक नाही वाटतं? आता जत्रेला मी एकटाच जाणार.’

आतां मी मोठा झालों आहें, म्हणजे चावी लावून तिजोरी कशी उघडावी हें मला ठाऊक असणार. तिजोरी उघडून गड्याला पैसे देतांना स्नान करून बाहेर आलेली आई मला

पाहून म्हणेल,'अरे खट्याळा तूं हें चालवलं आहेस तरी काय?'

मी आईला म्हणेन, 'आई मी बाबांएवढा मोठा झालोंय् हें तुला ठाऊक नाही वाटतं? आता मी तिजोरी उघडून गड्याला पैसे देणार.'

मग आई आपल्याशींच म्हणेल, 'खरंच की, आता हा मोठा झालाच आहे. यानें गड्याला पैसे दिले तर चालतील.'

ऑक्टोबरची सुट्टी पडली कीं, बाबा घरीं येतील. येतांना ते माझ्यासाठी छोटे छोटे बूट आणि छोटे छोटे कपडे आणतील.

मग मी बाबांना म्हणेन, 'बाबा, हे कपडे तुम्ही आता दादालाच द्या कसे. कारण मी आता तुमच्याएवढा मोठा झालोंय् ना.'

मग बाबा विचारांत पडतील आणि स्वतःशींच म्हणतील, 'खरंच की, हा आता मोठा झाला आहे. स्वतःचे कपडे आता तो स्वतःच विकत आणील.'

२. रुसवा

आई समज मी तुझा बाळ नसतों आणि कुत्र्याचें छोटंसं पिल्लूं असतों तर तुझ्या ताटांतला घास मला तूं खाऊं नकोस असं म्हणाली असतीस ना.

माझ्या अंगावर ओरडून, हाड हाड, चालता हो इकडून असं तूं म्हणाली असतीस का?

मग आम्ही नाही जा. आता तूं मला हांक मारलीस की मी मुळीच ओ देणार नाही आणि मी तुझ्याकडून भरवून घेणार नाही.

आई समज मी तुझा बाळ नसतों आणि छोटासा हिरवा पोपट असतों तर तूं काय केलं असतंस ग मला? मी उडून

जाईन म्हणून तूं मला पिंजऱ्यांत कोंडून ठेवलं असतंस का ग ?

माझ्याकडे रागानं बोट करून " असा वाईट पक्षी मेला, रात्रंदिवस पिंजऱ्याच्या गजावर डोकं आपटीत बसतो " असं तूं म्हणाली असतीस का ?

मग आम्ही नाही जा. मी जंगलांत दूर कुठेंतरी पळून जाईन आणि पुन्हा कधीं कधी म्हणून तुझ्या कुशींत येणार नाही.

**३. तर किती बरं झालं असतं ?**

सकाळीं दहाचे टोले पडले की, मी शाळेला जायला निघतों. समोरच्या गल्लींत गेलों कीं, मला फेरीवाला भेटतो. तो हांक देत असतो, " बांगड्या, बांगड्या घ्या हो बांगड्या. "

माझ्यासारखी शाळेंत पोचायची त्याला मुळीच घाई नसते. त्याला हवं तेव्हा तो जातो. त्याला हव्या त्या त्या रस्त्याने तो जातो. अमुक वेळींच घरीं परतायला पाहिजे, असं बंधन त्याच्यावर नसतं.

खरंच मी बांगडीवाला असतों तर किती बरं झालं असतं. सारा दिवस मी रस्त्यानं ओरडत फिरलों असतों, " बांगड्या घ्या हो बांगड्या."

संध्याकाळीं चार वाजतां मी शाळेंतून घरीं परत येतों.

वाटेंत त्या समोरच्या घराचा माळी बागेंत खणत असलेला दिसतो. हातांत कुदळ घेऊन तो त्याला हवं तसं काम करतो. तो उन्हांत राहिला, पावसांत भिजला, किंवा त्यानं कपडे मळवले तरी त्याला कुणी बोलत नाही.

खरंच मी जर माळी असतों, तर किती बरं झालं असतं. सारा दिवस कुदळ घेऊन बागेंत खणत बसलों असतों. कुण्णी कुण्णीहि मला नाही म्हणालं नसतं.

रात्र झाली की आई मला झोपी जायला सांगते. माझ्या खोलीच्यां खिडकींतून समोरच्या रस्त्यावर गस्त घालीत फिरणारा पहारेकरी मला दिसतो.

रस्त्यावर दाट अंधार असतो. लालभडक कपाळावर डोळा असलेल्या राक्षसासारखा दिव्याचा खांब उभा असतो.

हातांतल्या कंदिलाला झोके देत आपली भली मोठी सावली ओढीत पहारेकरी आपला फिरत असतो. कितीहि रात्र झाली तरी त्याच्या आयुष्यांत तो झोंपी जात नाहीं.

खरच मी पहारेकरी असतों तर किती बरं झालं असतं ? कंदिलाच्या प्रकाशांत सावल्यांशीं खेळत मी रात्रभर रस्त्यांतून भटकलों असतों.

### ४. चाफ्याचें फूल

समज आई, मी त्या उंच झाडाच्या उंच फांदीवरचं चाफ्याचं फूल झालों तर तूं मला ओळखशील कां ?

तूं म्हणशील, 'अरे बाळा तूं गेलास तरी कुठे? मी माझ्यापाशींच हंसत बसेन आणि अगदी गप्प राहीन.

मी हळूच माझ्या पाकळ्या उघडीन आणि बरं का आई, तूं काम करीत असतांना दुरून तुला पाहीन.

आंघोळ करून, ओलेते केंस पाठीवर सोडून, चाफ्याच्या झाडाखालून तुळशीच्या कट्ट्यावर प्रार्थना करण्यासाठी तूं जाऊं लागलीस की तुला फुलाचा वास येईल, पण तो कुठून येतो आहे हें तुला मुळींच कळायचं नाहीस.

दुपारचीं जेवणं झाल्यानंतर तूं खिडकीपाशीं रामायण वाचीत

बसलीस की मीं माझी इवलीशी सावली जिथल्या ओळी तूं वाचीत असशील त्या पानावर हळूंच पाडीन.

ही इवलीशी सावली आपल्या बाळाची आहे हें तुला कळेल तरी का ग?

दिवे लागणीच्या वेळीं हातांत दिवा घेऊन तूं गोठ्याकडे जाऊं लागलीस की मी अचानक जमिनीवर उडी टाकीन आणि पुन्हा तुझं बाळ होईन. तुझ्यापाशीं येऊन म्हणेन, 'आई गोष्ट सांग ना ग.'

मग माझ्याकडे बघून तूं म्हणशील, 'अरे खट्याळा, सारा दिवस होतास तरी कुठं? मग मी म्हणेन, आई, मी तुळा मुळीच कांही सांगणार नाहीं.'

## प्रा. राम शेवाळकर

### आस

किती थोर ऐश्वर्य आई तुझें हें
शशी–सूर्य यांचीं पदीं पैंजणें
घालूं तुला कोणती माळ कंठीं
खुलावी तुझी दिव्यशोभा जिनें?
तुझीं अन्नधान्यें तशी संपदाही
मला स्वेच्छया तूं कधी अर्पिशी
काढून घेशी दिलेलें कधी तूं
देणें न देणें तुझी ही खुषी.
असें काय कैसे तुला मी वहावें,
ओशाळतो येथ माझेपणा
द्रव्यें तुझी तूज अर्पूनिया का
होते कधी पूर्ण अभ्यर्चना?
ठावे तुला, एवढी फक्त आहे
माझी स्वताची कमाई अशी
ज्याचा अहंकार माझ्या मनाला
ऐसें व्यथारत्न बावनकशी.
देतों तुला दीर्घ जोपासलेलें
तेजोमुखी दुःख माझें गडे

मोलें तयाच्या मला त्वत्कृपेची
छाया मिळो, भाग्य हें केवढें ...

✻

## उपायन

होईल सांज, जाईल
रे, पूजनवेळ टळून,
कर लगबग, घेई कृपेने
हें इवलें फूल खुडून..
उमललेलें तुझ्यास्तव, बघतें,
स्पर्शाची तुझिया वाट
ओघळेल, अवमानाने
होऊन खिन्न, मातींत,
मान्य या मुळी न सुरंग
वा मोहविणारा गंध
परि जीव तुलाच वहावा
हा त्यास कधीचा छंद.
तूं स्वयं आपुल्या हातें
कुर्वाळुन त्यास खुडावें
त्या करस्पर्शहर्षाने
अन्, कृतार्थ त्याने व्हावें..
क्लांत विभूषण होणें
ही नसे तयाला आस

तव हस्तें देठ तुटावा
हा एक भाबडा ध्यास,
होईल सांज, जाईल,
रे, पूजनवेळ टळून,
कर लगबग, घेई कृपेने
हें इवलें फूल खुडून..

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम 38205 विः काव्य
क्रमांक 1585 नों दिः 25-7-62

## मधुकर केंचे

### पुकार

मला तुझी आस
तुझाच ग ध्यास
उरीं हाच घोष निरंतर..
वासनाधीन मी
फिरे वणवण
वाढे सुनेपण संसाराचें.
काजळे काळीज,
रात कासावीस
पहाया प्रकाश तळमळे.
विकारांच्या आड
मन माझें पिसें
टाहो फोडितसे तुझ्यासाठी..
तडकवी शांति
मेघ गडगडे
शांतिच आवडे त्यास परी..
तैसे माझें बंड
तुला मी नाकारी
तरीहि भरारी तुझ्याकडे..

## जीवनधारा

वाहे माझ्या नसांनसांतुन
जीवनधारा जी रातंदिन
त्याच गतीने लयतानेसह
ती चालतसे या विश्वांतुन.
तीच होतसे कोंभ तृणाचा
धुळींत उमटे हरीख हिरवा
तीच चेतन नटते होऊन
नाना नूतन पुष्पा-पल्लवी.
सागरांतहि तीच सदोदित
लहरींच्या पाळण्यांत झुलते
जन्ममृत्युच्या आकारांनी
आरोहीं अवरोहीं डुलते.
रोमांचांचा उत्सव फुलवी
हीच माझिया अंगांतून
युगनृत्याचें स्पंदन घडवी
माझ्याही रक्ताचें कंपन...
अभिमानाने भरून ये मन
महान हें होताच आकलन
ती विश्वाची जीवनधारा
वाहे माझ्या नसांनसांतुन...

✻

मराठी ग्रंथ संग्रहालय
दा. क्र. 92099
संग्रह शाखा (स्थळ

चांदेर हासीर बांध भेंगे छे

तेज चंद्राचें उसळे
फुटे हासण्याचा बांध
निशिगंधा, ओत ओत
तुझा अमृताचा गंध
वेड्या वाऱ्यास कळे न
त्याशीं पाचरिते कोण
जेथे जाई तेथे त्याशी
करी फुलवणी धुंद.
निळ्या नभाच्या निटिला
आज चंदन माखलें
वनीं हंसाच्या जोड्यांनी
आज पंख विस्फारले.
पारिजाताचे केशर
शशि सिंचे भुईवर
इंद्रपुरीची रमणी
काय पाजळते सांज ?

☙

ब्रिष्टि पोडे टापु . ुपुर

दिवसाचें तेज निवे सूर्य डुबे डुबे
नभ घेरुन ढग जमले चांदण्याच्या लोभें
मेघावरीं मेघ आले रंगावरीं रंग

कांस्याची देवघाट वाजे ढांग ढांग,
त्या तिकडे वर्षेनें झाकुळली राई
शतमाणिक झळझळून इथे रोषणाई
बाळपणाचें स्मरते मळ्यांतुन गान
पाणी पडे टपा टपा नदी ये भरून...
मेघांचे खेळ नभीं सीमा ओलांडून
अडथळा न देशांचा विश्वाचें आंगण
नाना नवपुष्पवना भिजवोनी जाती
दर पळास खेळ नवे खेळतात किती,
मेघांचे खेळ बघुन मला ये आठव
कोनोकोनीं खेळलेलों किती लपंडाव,
बाळपणींचें तेव्हा आठवतें गान
ब्रिष्टी पोडे टापुरटुपुर नोदे एलो बाण..
हासणारी माय दिसे उजळल्या घरीं
स्मरते, ढग गर्जतांच धडधडे उरीं
रात्रीच्या काठावर ढार्ढुर बाळ
मायसवें खोड्या-छळ नसे त्याचा ताळ
गडबड अन् बंड असे घरामध्ये चाले
बाहिर ढग डरतात जग सारे भ्याले,
आईने म्हटलेलें आठवतें गान
पाणी पडे टपाटपा नदी ये भरून..
शुओदुओ राण्यांच्या आठवती कथा
अभिमानी कंकावति स्मरे तिची व्यथा
कोपऱ्यांत मिणमिणता आठवतो दिवा
भिंतीवर पडणाऱ्या काळ्याकाळ्या छाया

दडदडदड शब्द फक्त पाण्याचा बाहेर.
बंडखोर पोट्टेहि कथेमध्ये चूर
त्या संगें आठवतें बरसाती गान,
ब्रिष्टि पोडे टापुरटुपुर नोदे एलो बाण.
आला पाऊस कधी पूर न ये कोठुनीं
शिवविवाह झाला ती कधीची कहाणी
तेव्हाच्या थाटाने गर्जतात मेघ
ठरठरून कडकडते लख्ख लख्ख वीज
तीन मुलींचा विवाह काय बरे पुढे...
न कळे मग काय...कुण्या नदीतटीं देशी
अंगाई कोणास्तव कोण गाई गान
ब्रिष्टि पोडे टापुरटुपुर नोदे एलो बाण....

⁕ ⁕

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 92८७99
REFBK-0012711
REFBK-0012711

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थलप्रत.
अनुक्रम ३८२६५ वि:
क्रमांक ९५८५ नों. दि. २५-१-५०